७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक
सोमवार, दि. २९ जून २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १८४ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ३ रूपये

# पालघर जिल्ह्याच्या विकासाला वेग : मुख्यमंत्री

## वाढवण बंदर, बुलेट ट्रेन, विमानतळ आणि सागरी सेतू प्रकल्पांची मुख्यमंत्र्यांकडून पाहणी

**मुंबई (दै. संध्या)**



पालघर दि. २८: राज्याच्या पायाभूत सुविधा आणि आर्थिक विकासाला नवी गती देणाऱ्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांचा प्रत्यक्ष आढावा घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पालघर जिल्ह्याचा दौरा केला. यावेळी वाढवण बंदर, मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्प, प्रस्तावित वाढवण आंतरराष्ट्रीय विमानतळ, नारिंगी खाडी पूल आणि उत्तन–विरार सागरी सेतू या महत्त्वाच्या प्रकल्पांच्या कामांची पाहणी करून संबंधित विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.

चिंचणी येथील समुद्रकिनाऱ्यावर प्रस्तावित वाढवण बंदर प्रकल्पाची पाहणी करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अंतर्गत रस्त्यांचे जाळे, वन मंजुरी, वीजपुरवठा, रेल्वे कनेक्टिव्हिटी, भूसंपादन, पाणीपुरवठा, कौशल्य विकास तसेच मच्छिमारांच्या नुकसानभरपाई संदर्भातील कामांचा सविस्तर आढावा घेतला. सुमारे ७६ हजार २२० कोटी रुपये खर्चाच्या या ग्रीनफिल्ड बंदराची उभारणी १,४४८ हेक्टर क्षेत्रावर होणार असून पुढील ६० महिन्यांत प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन आहे. अत्याधुनिक 'नेक्स्ट जनरेशन' जहाजे हाताळण्याची क्षमता असलेले हे बंदर भारतातील सर्वात मोठ्या खोल समुद्री बंदरांपैकी एक ठरणार आहे.

यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पातील बोईसर स्थानकाच्या निर्माणाधीन कामांची आणि प्रकल्प आराखड्याची पाहणी केली. कामाचा वेग, दर्जा आणि नियोजित वेळेत प्रकल्प पूर्ण करण्याबाबत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली.

यावेळी प्रस्तावित वाढवण आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या जागेचीही पाहणी करण्यात आली. हा विमानतळ डीएफसी (Dedicated Freight Corridor), बुलेट ट्रेन, उत्तन–विरार सी-लिंक, मुंबई–वडोदरा द्रुतगती मार्ग आणि मुंबई–अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग यांच्या सान्निध्यात उभारला जाणार असल्याने वाढवण व मुरबे बंदरांमधील मालवाहतुकीला मोठी चालना मिळणार आहे. तसेच मुंबई विमानतळावरील वाढता प्रवासी ताण कमी करण्यासाठीही हा प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

मुख्यमंत्र्यांनी एमएमआरडीएमार्फत उभारण्यात येणाऱ्या नारिंगी खाडी पुलाच्या कामाचाही आढावा घेतला. सुमारे ८५० कोटी रुपये खर्चाच्या या ४.१० किलोमीटर लांबीच्या आणि १२ मीटर रुंदीच्या पुलामुळे वसई-विरारचा सफाळे, पालघर आणि बोईसर या शहरांशी थेट संपर्क प्रस्थापित होणार असून प्रवासाचे अंतर सुमारे ४० किलोमीटरने आणि वेळ ४५ मिनिटांनी कमी होणार आहे.

उत्तन–विरार सागरी सेतू प्रकल्पाबाबतही सविस्तर चर्चा करण्यात आली. सुमारे ५८ हजार ७५४.५१ कोटी रुपये खर्चाच्या या सहापदरी सागरी सेतूला चारपदरी जोडरस्ते आणि दोन्ही बाजूंना आपत्कालीन मार्गिका प्रस्तावित आहेत. या सेतूची थेट जोडणी मुंबई–अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गाशी होणार असल्याने दक्षिण मुंबई ते अहमदाबाद दरम्यानचा प्रवास अधिक जलद, सुरक्षित आणि सुलभ होणार आहे.

यावेळी वनमंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री गणेश नाईक, मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे, खासदार डॉ. हेमंत सवरा, आमदार राजेंद्र गावित तसेच कोकण विभागाचे पोलीस महानिरीक्षक चंद्रकिशोर मीना, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचे उपाध्यक्ष कार्यकारी संचालक दीपक कपूर, जेएनपीएचे अध्यक्ष गौरव दयाल, मीरा - भाईंदर वसई – विरार पोलीस आयुक्त निकेत कौशिक, जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, पोलीस अधीक्षक यतीश देशमुख, डहाणू प्रकल्प अधिकारी विशाल खत्री तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. राज्यातील बंदर, वाहतूक, उद्योग, निर्यात आणि रोजगारवाढीच्या दृष्टीने पालघर जिल्ह्यातील हे सर्व प्रकल्प 'गेमचेंजर' ठरणार आहेत.

# धाराशिवमध्ये ५०० कोटींचे प्लॉट खरेदी, ओमराजेच्या मागे ईडी लागली

## भामटा, सोंगाड्या म्हणत संजय राऊत कडाडले

**मुंबई (दै. संध्या)**



धाराशिवमध्ये आयोजित केलेल्या शिवसेना ठाकरे गटाच्या मेळाव्यात खासदार संजय राऊत यांनी नुकताच शिंदे गटात प्रवेश केलेल्या खासदार ओमराजे निंबाळकर यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. धाराशिवमध्ये ऑपरेशन तुडवा सुरु झाले आहे आणि ते सक्सेस झालं आहे. गद्दार, भामटा आणि सोंगाड्या असे म्हणत अगदी शेलक्या शब्दात राऊतांनी ओमराजेंचा समाचार घेतला आहे. तसेच ओमराजे निंबाळकरांनी शिवसेना का सोडली? याबाबत देखील संजय राऊत यांनी खुलासा केला आहे.

हा भामटा का गेला? हे सांगताना संजय राऊत म्हणाले की, त्याने प्रचंड भ्रष्टाचार केल्याची टीका ओमराजे निंबाळकरांवर केली. आता मला असेही वाटत आहे की, त्याच्या वडिलांचा जो खून झाला आहे, त्या खुनामागे देखील वेगळं काहीतरी रहस्य आहे असे संजय राऊत म्हणाले. हा गेला कारण पवनराजे मल्टिस्टेट या त्याच्या कंपनीने 500 कोटींचे प्लॉट आख्ख्या धाराशिवमध्ये खरेदी केले. त्याची ईडीकडून चौकशी लागली म्हणून तो शिंदे गटात गेला असल्याचा आरोप संजय राऊतांनी केला. हा घाबरुन शिंदे गटात गेला आहे. वडिलांच्या नावाने स्थापन केलेल्या गरिबांच्या नावाने बनावट खाती उघडून कोट्यावधींचा भ्रष्टाचार केला आहे. तेरणातील भंगार विकून त्याने पैसा खाल्ला असे अनेक गुन्हे केले म्हणून या सगळ्यांची चौकशी लागली. म्हणून हा डरपोक सोंगाड्या पक्ष सोडून गेल्याचे राऊत म्हणाले. आम्ही 15, 20 वर्ष एका सापाला दूध पाजले होते. पण आता त्याचा फणा ठेचायची वेळ आली असल्याचे राऊत म्हणाले.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

# नागपुरात FDA ची मोठी कारवाई

## २० लाखांहून अधिक किंमतीचा विनापरवाना साठवलेला औषधसाठा जप्त

**मुंबई (दै. संध्या)**



नागपुरातील न्यू एरा हॉस्पिटलच्या मेडिकल स्टोअरवर एफडीएनं मोठी कारवाई केली आहे. विनापरवाना साठवलेला 20 लाखांहून अधिक किंमतीचा औषधसाठा जप्त केला आहे. एफडीएने रुग्णालयाच्या बेसमेंटमधून औषधांचा साठा जप्त केला आहे. संबंधित जागेसाठी वैध औषध विक्री परवाना नसल्याचा आरोप केला आहे. औषधांच्या खरेदी-विक्रीची कागदपत्रे सादर करण्यात अपयश आल्यानं ही कारवाई केली आहे. औषधांचे दोन नमुने विश्लेषणासाठी प्रयोगशाळेत पाठवले आहेत. औषधे आणि सौंदर्यप्रसाधने कायद्यानुसार पुढील कायदेशीर कारवाई होणार आहे. रुग्णांना रुग्णालयाशी संलग्न मेडिकलमधूनच औषधे घेण्यास भाग पाडल्याचा आरोप केला आहे. प्रिस्क्रिप्शनची प्रत रुग्ण किंवा नातेवाईकांना न दिल्याचे निदर्शनास आले आहे. संगणकीय इंडेंटद्वारे थेट फार्मसीकडे औषध मागवण्याची पद्धत उघड झाली आहे. रुग्णांना बाहेरुन औषधे घेण्याची मुभा या एफडीएच्या आदेशाचे उल्लंघन केलं आहे. रुग्णांना निवडीचा अधिकार असल्याचा फलकही रुग्णालयात आढळला नाही. तपासणीत औषध विक्री नियमांचे अनेक उल्लंघन केल्याचे उघड झाले आहे. केमिस्ट अँड ड्रगिस्टचा नामफलक नसल्याचे आढळले आहे. मुदतबाह्य औषधांसाठी स्वतंत्र व्यवस्था नसल्याचा ठपका, Schedule H-1 औषधांच्या साठा आणि नोंदीत तफावत आढळली आहे. तपासणी पुस्तक (फॉर्म-35) उपलब्ध नसल्याचे निदर्शनास, रुग्णालयाला कारणे दाखवा नोटीस बजावून पुढील कारवाई प्रस्तावित आहे. विशिष्ट मेडिकलमधून औषधे घेण्यास सक्ती झाल्यास तक्रार करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. दबंग अधिकारी तुकाराम मुंढे यांनी अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्त पदाचा कारभार हाती घेतल्यानंतर राज्यातील भेसळखोरी विरोधात कडक पावले उचलली आहेत. मंदिरांच्या परिसरात खाजगी दुकानदार प्रसादाच्या नावाखाली भाविकांना अतिशय निकृष्ट दर्जाच्या पेढ्यांची विक्री करत असल्याच्या तक्रारी अन्न व औषध प्रशासनाला प्राप्त झाल्या होत्या.


# आरोपींना ८ दिवसांची पोलीस कोठडी

ठाणे (दै. संध्या) : महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा पेपरफुटी प्रकरणात भिवंडी पोलिसांच्या तपासाला वेग आला आहे. या प्रकरणातील तिन्ही आरोपींना आज न्यायालयात हजर करण्यात आले. पोलिसांनी दहा दिवसांच्या कोठडीची मागणी केली होती. मात्र न्यायालयाने आरोपींना 6 जुलैपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणात आंतरराज्यीय रॅकेट कार्यरत असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला असून आणखी दोन आरोपी फरार असल्याची माहिती तपासातून समोर आली आहे. राज्य शिक्षक पात्रता म्हणजेच टीईटी पेपरफुटी प्रकरणातील आरोपी धीरज बलराज सिंग (२८, हरियाणा), राजीव साव (४५, बिहार) आणि आकाशकुमार स्वराजकुमार (३०, बिहार) यांना रविवारी भिवंडी जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयातील न्यायाधीश एस. एम. सुतार यांच्या सुट्टीच्या न्यायालयात हजर करण्यात आले. तपासादरम्यान आरोपींकडून टीईटी परीक्षेची प्रश्नपत्रिका जप्त करण्यात आल्याचे पोलिसांनी न्यायालयाला सांगितले. तसेच या प्रकरणामागे आंतरराज्यीय रॅकेट असल्याचा संशय असून दोन संशयित आरोपी अद्याप फरार आहेत.

# राजगड सहलीवर काळाचा घाला!

## पाबे घाटात ट्रॅव्हल बस ४० फूट दरीत; दोन ठार, १९ जण जखमी

**पुणे (दै. संध्या)**





राजगड किल्ला पाहण्यासाठी मुंबईहून निघालेल्या पर्यटकांच्या खाजगी बसचा (ट्रॅव्हलचा) राजगड तालुक्यातील पाबे घाटात भीषण अपघात झाला असून यामध्ये दोन जणांचा मृत्यू तर 19 जण जखमी झाल्याची घटना रविवार (ता. 28) जून रोजी पहाटे एक वाजण्याच्या सुमारास घडली. या दुर्घटनेमध्ये विश्वास बाबुराव सातिम (वय 25.वर्ष)राहणार विलेपार्ले, मुंबई व ध्वनी चंद्रेश ठक्कर (वय 23 वर्ष) राहणार कांदिवली, मुंबई या दोघांचा मृत्यू झाला असून ट्रॅव्हल बसच्या ड्रायव्हर सह 18 जण गंभीर जखमी झाले असून काही जणांवर वेल्हे ग्रामीण रुग्णालयात तर पुण्यातील खाजगी रुग्णालयात काही जणांवर उपचार सुरू असल्याची माहिती वेल्हे पोलिसांनी दिली. वेल्हे पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मुंबईतील एक खाजगी कंपनीतील 20 जणांचा ग्रुप खाजगी ट्रॅव्हल क्रमांक एमएच- ४७- ए. एस. 0934 या बसमधून किल्ला राजगड पाहण्यासाठी येत असताना पाबे घाट उतरताना गावाच्या जवळ असलेल्या वळणावर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने बसने रस्त्यावरील संरक्षण कठडा तोडत सुमारे 30 ते 40 फूट दरीत कोसळली. या दुर्घटनेमध्ये बसमधील दोघांचा मृत्यू झाला असून 19 जण जखमी आहेत. यामध्ये खाजगी बसचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

घटनेची माहिती मिळताच वेल्हे पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक किशोर शेवते यांच्या मार्गदर्शनाखाली गोपनीय विभागाचे कर्मचारी आकाश पाटील ,निलेश राणे, पंकज मोघे, यांच्यासह राजगड व हवेली आपत्ती व्यवस्थापन टीमचे सदस्य तानाजी भोसले, गणेश सपकाळ ,संदीप सोळसकर, कृष्णा मरगळे यांनी घटनास्थळी धाव घेतली व तातडीने बचाव कार्य सुरू करण्यात आले बसच्या खाली अडकलेल्या ड्रायव्हर तसेच इतर पर्यटकांना बाहेर काढत प्राथमिक उपचारासाठी वेल्हे येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. यावेळी वेल्हे ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉक्टर चंद्रकांत भोईटे म्हणाले या अपघातामध्ये दोन जणांचा मृत्यू झाला असून ड्रायव्हरसह इतर 19 जण जखमी आहेत.


## ढिंग-टांग




## खंडोजी खोपडे, सूर्याजी पिसाळ, आता ह्याच्या कपाळावरचा 'गद्दार' डाग कधी पुसणार

# उद्धव ठाकरेंची ओमराजेंवर घणाघाती टीका

**धाराशिव (दै. संध्या)**



राज्यातील शिवसेना पक्षात झालेलं दुसरं सर्वात मोठं बंड म्हणजे ऑपरेशन टायगर, एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वात ठाकरेंच्या शिवसेनेतील 6 खासदार फोडण्यात आले असून त्यांचा शिवसेना पक्षात प्रवेशही झाला. उद्धव ठाकरेंना दुसऱ्यांदा एकनाथ शिंदेंकडून हा मोठा धक्का देण्यात आलाय. त्यामुळे, उद्धव ठाकरेंनी 6 फुटीर खासदारांच्या मतदारसंघात दौरा सुरू करत संबंधित खासदारांवर जोरदार हल्लाबोल केलाय. धाराशिवमध्ये आज खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या मतदारसंघात उद्धव ठाकरेंनी सभा घेतली. या सभेतून संजय राऊतांनी सर्वप्रथम खासदार ओमराजेंवर हल्लाबोला केला.

उद्धव ठाकरे फिरत नाही म्हणतात उद्धव ठाकरे फिरायला लागले की काय होतं ते महाराष्ट्र बघतोय. या सभा नाही, या माझ्या कौटुंबिक बैठका आहेत, यांनी कितीही आमदार फोडू दे, तुमच्या उरावर भगवा फडकवल्याशिवाय मी राहणार नाही, असे म्हणत उद्धव ठाकरेंनी धाराशिवमधून फुटीर खासदारांवर निशाणा साधला. लोकसभा निवडणुकांवेळी, समोरच्यांकडून पैशांचा पाऊस पडत होता, तेव्हा या गद्दारासाठी एका शेतकऱ्याने त्याच्याकडचे पैसे निवडणुकीसाठी दिले. गद्दाराच्या सभेला मी आलो होतो तेंव्हा एक गरीब शेतकरी आला आणि म्हणाला, मला खासदारला पैसे द्यायचे आहेत. काय भाषण काय देत होता... माझा फोन नंबर घ्या म्हणायचा, मी फोन करायला लागलो तर फोन उचलायचा नाही. मग, मी कैलासला म्हणालो अरे हा तर फोन उचलत नाही, असा किस्सा उद्धव ठाकरेंनी आपल्या भाषणातून सांगितला.

यांचं एक भाषण होतं, त्या भाषणात तो म्हणाला, खंडोजी खोपडे, सूर्याजी पिसाळ म्हटलं तर आपण कोणाचं नाव घेतो. आता, तुझ्यावरील गद्दारीचा शिक्का कसा पुसणार? असा सवाल उद्धव ठाकरेंनी ओमराजेंना विचारला. यावेळी, ओमराजेंची नक्कल देखील त्यांनी केली होती. मी जेंव्हा याच्या प्रचारसाठी आलो होतो तेव्हा म्हणालो होतो दोन वाघ माझ्याकडे आहेत. मात्र, त्यातला हा वाघचा कातडं पांघरलेला लांडगा निघाला, अशा शब्दात ओमराजेंनी उद्धव ठाकरेंवर जोरदार टीका केली.

या मिंदेसेनेला भवितव्य काय आहे? मग हे खासदार तिकडे का गेले? कारण भाजप मध्ये गटबाजी सुरू असून त्यांचं ऑपरेशन देवेंद्र सुरु आहे. काही दिवसात देवेंद्र फडणवीस यांची मुख्यमंत्रीपदाची खुर्ची दुसऱ्या कोणाला दिली तर आश्चर्य वाटणार नाही.

देवेंद्र फडणवीस दिल्लीचे स्वप्न पाहत आहेत, संघ सुद्धा पंतप्रधान पदासाठी देवेंद्र फडणवीस यांना पाठिंबा देईल, मग माझं काय होईल यासाठी हे खासदार देवेंद्र फडणवीस यांना न देता बाजूला ठेवले. जेंव्हा पंतप्रधान कोण? यावेळी हे खासदार देवेंद्रला मत देणार नाहीत. 2029 पर्यत पंतप्रधानपदाचे जे चेहरे असतील त्यांचा पत्ता कट केला जाईल, असे उद्धव ठाकरेंनी म्हटलं.

### मी उद्धव ठाकरेंना सोडणार नाही - कैलास पाटील

उद्धव ठाकरेंच्या उपस्थितीत आमदार कैलास पाटील यांनी भाषण करताना काहीही झालं तरी मी उद्धव ठाकरेंची साथ सोडणार नाही, काहीही झालं, काहीही वेळ आली तरी मी शिवसैनिकांना वाऱ्यावर सोडणार नाही, असे आमदार कैलास पाटील यांनी म्हटलं. शेवटच्या श्वासापर्यंत उद्धव ठाकरेंची साथ सोडणार नाही, हे कैलास पाटलांनी सांगितलंय.

# सत्यमेव जयते फार्मर कपचा आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या हस्ते शुभारंभ : कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

**मुंबई (दै. संध्या)**



'पानी फाऊंडेशन'मार्फत 2022 पासून 'सत्यमेव जयते फार्मर कप स्पर्धा' महाराष्ट्रात 46 तालुक्यांत सुरू आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची पानी फाऊंडेशनच्या प्रयत्नांना सुरूवातीपासूनच साथ लाभली आहे. विविध टप्प्यांत शेतकऱ्यांसाठी काम करत असलेल्या 'सत्यमेव जयते फार्मर कप 2026' चा शुभारंभ सोमवार दिनांक 29 जून 2026 रोजी सकाळी 10.30 वाजता मुंबई येथे वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे अशी माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 23 मार्च 2025 रोजी फार्मर कप 2024 मधील शेतकरी गटांना सन्मानित करताना फार्मर कप उपक्रमाचा संपूर्ण महाराष्ट्रात 351 तालुक्यांत विस्तार करावा अशा सूचना दिल्या होत्या. मुख्यमंत्री यांनी घेतलेल्या निर्णयानंतर महाराष्ट्र शासनाचा कृषि विभाग, ग्रामविकास मधील महिलांच्या उपजीविकेसाठी काम करणारी उमेद व पानी फाऊंडेशन यांच्या सहभागातून शेतकऱ्यांसाठी जनचळवळ उभी करण्यासाठी एकत्रितपणे विविध टप्प्यांवर कार्यवाही सुरू आहे. पहिल्या टप्प्यात कृषि विभागातील 12 हजार 111 व उमेद मधील समूह संसाधन व्यक्ति (ग्रामसखी ) 30359 यांचे फार्मर कप व गटशेतीचे महत्त्व यासाठी प्रशिक्षण घेण्यात आले. दुसऱ्या टप्प्यामध्ये 45 हजार 190 शेतकरी व कृषिसखी यांना फार्मर कप उपक्रमाबद्दल माहिती देण्यात आली. तिसऱ्या आणि महत्त्वाच्या टप्प्यात 36 प्रशिक्षण केंद्रावर शेतकरी व उमेद मधील समूह संसाधन व्यक्ति अशा 32 हजार 993 शेतकऱ्यांचे तीन दिवसीय निवासी प्रशिक्षण एप्रिल 2026 अखेर पूर्ण करण्यात आले.चौथ्या टप्प्यामध्ये गटशेतीतूनच शेतकऱ्यांचे प्रश्न सुटू शकतात.शेतीचा खर्च कमी होऊन पिकाची उत्पादकता वाढविता येते, कृषि विद्यापीठाच्या शेतीत प्रमाणित कार्यपद्धतीचा अवलंब केला, तर शेतकऱ्यांचा प्रवास समृद्धीकडे होईल. यासाठी शेतकरी गट बांधणीमध्ये शेतकऱ्यांनी उत्कृष्ट प्रतिसाद दिला व एक पीक, एक गट अंतर्गत 25 हजार 823 शेतकरी गट फार्मर कप उपक्रमासाठी सज्ज झाले आहेत.पाचव्या टप्प्यामध्ये शेतकरी गटांना ज्ञान मिळावे यासाठी कृषी विद्यापीठातील शात्रज्ञ यांच्या मदतीने खरीप हंगामामधील पिकासाठी दररोज डिजिटल शेतीशाळा 25 मे 2026 पासून सुरू करण्यात आल्या आहेत. सहाव्या टप्प्यामध्ये 25 हजार 823 शेतकरी गट शेतीत येणाऱ्या समस्येवर मात करण्यासाठी "सत्यमेव जयते फार्मर कप 2026" साठी सज्ज झाले आहेत, स्पर्धेसाठी त्यांनी सुरुवात केली आहे.

फार्मर कप म्हणजे शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारून समृद्धीकडे वाटचाल करणे. या महत्त्वपूर्ण उपक्रमाचा शुभारंभ शेतीतील नाविन्यपूर्ण उपक्रमांसाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल अशी माहिती कृषी आयुक्त सूरज मांढरे यांनी दिली.

## संपादकीय

# विकासापेक्षा वादग्रस्त वक्तव्यांचीच अधिक चर्चा

महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या विकासापेक्षा वादग्रस्त वक्तव्यांचीच अधिक चर्चा होताना दिसते. लोकप्रतिनिधींच्या गचाळ, बेफिकीर आणि बेजबाबदार वर्तनामुळे केवळ त्यांचीच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राची प्रतिमा मलिन होत आहे. समाजाला दिशा देण्याची जबाबदारी असलेल्यांची जीभ दिवसेंदिवस अधिकच बेफाम होत चालली आहे. या घसरत्या राजकीय संस्कृतीचे पहिले उदाहरण विधानसभेतील शोकप्रस्तावावेळी पाहायला मिळाले. विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिवंगत गायिका आशा भोसले यांच्याविषयीचा शोकप्रस्ताव वाचताना केलेल्या भाषिक चुका मराठीप्रेमींसाठी अत्यंत वेदनादायी ठरल्या. मराठी राज्याच्या विधिमंडळाचे सर्वोच्च पद भूषविणाऱ्या व्यक्तीलाच मराठी नीट वाचता येत नसेल, तर सामान्य नागरिकांनी मातृभाषेचा अभिमान कसा बाळगावा, हा प्रश्न निर्माण होतो.

मराठीची सक्ती करण्याची भाषा करणाऱ्या राजकीय पक्षांनी अशा प्रसंगातून काही धडा घेतला का, हेदेखील महत्त्वाचे आहे. कारण स्वतःच्या घरातच मराठीची उपेक्षा होत असेल, तर परप्रांतीयांकडून मराठीची अपेक्षा करण्याचा नैतिक अधिकार कितपत उरतो? या घटनेनंतर शिवसेनेचे खासदार संजय दीना पाटील यांनी पत्रकारांशी केलेली अर्वाच्य भाषा आणि उघड धमक्या आठवडाभर चर्चेचा विषय ठरल्या. माध्यमांशी अशा पद्धतीने वागणारे लोकप्रतिनिधी लोकशाहीचीच थट्टा करतात. नंतर दिलगिरी व्यक्त करून विषय मिटविण्याचा प्रयत्न झाला; मात्र अशा वक्तव्यांमुळे राजकीय संस्कृतीचा खालावलेला स्तर लपून राहत नाही. नाशिक विधान परिषद निवडणुकीनंतर महायुतीचे उमेदवार नरेंद्र दराडे यांच्या पराभवानंतर आमदार किशोर दराडे यांनी कॅमेऱ्यासमोर विरोधकांसह मतदारांवर केलेली शिवीगाळ तर अधिकच धक्कादायक होती. प्रचारकाळात विरोधकांच्या कुटुंबियांविषयी अवमानकारक भाषा वापरणे, निवडणुकीत कोट्यवधी रुपये खर्च झाल्याचे जाहीरपणे सांगणे आणि पराभवानंतरही आत्मपरीक्षणाऐवजी मतदारांनाच दोष देणे, हे लोकशाहीला शोभणारे नव्हते.

विशेष म्हणजे, राज्यभर टीका झाल्यानंतरही दिलगिरी व्यक्त करण्याचे भान त्यांना राहिले नाही. कदाचित जनतेची स्मरणशक्ती अल्प आहे किंवा लोक काहीच बोलत नाहीत, असा त्यांचा समज असावा. आजची शोकांतिका अशी की, अशा प्रकारच्या वक्तव्यांवर काही दिवस चर्चा होते आणि नंतर सर्व काही पूर्ववत होते. महात्मा गांधींच्या "वाईट बोलू नका" या संदेशाचा अर्थच जणू समाज विसरून गेला आहे. त्यामुळे बेताल वक्तव्य करणाऱ्यांचे फावते आहे. दरम्यान, नाशिक विधान परिषद निवडणुकीने अनेक राजकीय समीकरणे बदलली. महायुतीकडे स्पष्ट संख्याबळ असूनही अपक्ष उमेदवार गोकुळ गिते यांनी बाजी मारली. कोणत्याही मोठ्या पक्षाचा उघड पाठिंबा नसतानाही त्यांनी संयम, नियोजन आणि अचूक रणनीतीच्या बळावर विजय संपादन केला. भाजपचे सदस्य असलेले त्यांचे बंधू गणेश गिते उमेदवारीपासून दूर राहिले आणि गोकुळ गिते यांना पुढे करून आखलेली रणनीती यशस्वी ठरली. पडद्यामागे आखलेल्या या राजकीय खेळीने महायुतीच्या सर्व गणितांवर पाणी फेरले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच मंत्री गिरीश महाजन, उदय सामंत आणि दादा भुसे यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा करूनही गिते यांनी माघार घेतली नाही. निकालानंतर एकनाथ शिंदे यांनी तत्काळ गिते यांच्यासाठी विशेष विमान पाठविल्याने राजकीय संदेशही स्पष्ट झाला.

आज गिते बंधू नाशिकच्या राजकारणातील उदयोन्मुख नेतृत्व म्हणून पुढे येत आहेत. पुढील विधानसभा निवडणुकीसाठी ही निवडणूक रंगीत तालीम ठरल्याचे स्पष्ट दिसते. त्यांनी सर्व समाजघटकांना सोबत घेऊन संयमाने वाटचाल केली, तर त्यांचा राजकीय आलेख अधिक उंचावू शकतो. मात्र या संपूर्ण निवडणुकीचा दुसरा पैलू अधिक गंभीर आहे. नाशिकमध्ये सुमारे शंभर कोटी रुपयांचा खर्च झाल्याची चर्चा आहे.

## संस्कृत सुभाषित

रसान्तराण्येकरसं यथा दिव्यं पयोऽश्नुते।
देशे देशे गुणष्वेव मवस्थास्त्वमविक्रिय:।।
आकाशातून पृथ्वीवर एकाच प्रकारचे पाणी पडते, पण जमिनीवरील निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळे रस पाण्यात मिसळतात. तसेच निर्गुण आणि निराकार परमेश्वर पृथ्वीवर वेगवेगळ्या अवस्थांत दिसतो.

## गुरु वचन

### राजाचे अहोभाग्य

पुरातनकाळातील गोष्ट आहे. एक परमतपस्वी साधूसंत होते. ते जंगलामध्ये परमेश्वराचे भजन आणि साधनामध्ये तल्लीन राहत असायचे. एका दिवशी त्यांनी जास्तीचे अन्न गोळा करायचे नाही, असा निश्चय केला होता. पाहुण्यांनाही आपल्या भिक्षेतील अर्धे अन्न देऊन परमसुखाचा अनुभव घेत होते. एका दिवशी ते राजाजवळ गेले आणि म्हणाले की, या भागात दुष्काळ पडला आहे. राजधर्मानुसार हे लक्षात ठेवा की, प्रजेतील एकही व्यक्ती उपासी रहायला नको. राजाने दुष्काळ पीडितांची सेवा करण्याचा दृढ निश्चय केला. जाताजाता राजाने साधूला धन देण्याचा आग्रह केला. तेव्हा ते म्हणाले राजन मला एका वेळेची भिक्षा द्या. मी धन व अन्नाचा संग्रह करत नाही. मी माझ्या झोपडीपट्टीसमोरील उंबराचे फळ खाऊन माझे जीवन व्यतीत करत आहे. राजाने विचार केला की, साधू धन घेण्यास इन्कार करत आहे. राजाने आपल्या मंत्रीला काही उंबराचे फळ आणायला सांगितले. आणि त्यामध्ये सोने, चांदी, हिरे भरुन साधूच्या उंबराच्या झाडाखाली टाकले. साधूने खाण्यासाठी जेव्हा उंबर उचलले आणि तोडून बघितले तर त्यामध्ये सोने आणि हिरे पाहून ते जमीनवरच फेकून दिले. राजाने संध्याकाळी गुप्तमंत्रीला तिथे पाठवले. मंत्र्याला उंबर तिथेच पडलेले दिसले. जेव्हा त्याने राजाला जाऊन सांगितले असता, राजा म्हणाला माझ्या राज्यात असे साधू आहेत. त्यामुळे मी नशीबवान आहे.

## उपदेशकथा

### प्रोत्साहन

उपकाराची फेड उपकारांनीच करावी असा सुसंस्कृत जगाचा शिरस्ता आहे पण त्यातही तारतम्य हवे. माणसे पुष्कळदा भिडस्तपणे ढिसाळ वागतात. एखादाच खंबीरपणे वागतो. 'मॉडर्न रीव्ह्यू' या प्रख्यात मासिकाचे संपादक रामानंद चातर्जी काशीला गंगास्नानासाठी गेले असताना ओघ जोरदार होऊन ते बुडू लागले. एका बंगाली तरुणानेच त्यांना वाचवले. त्यांनी त्याला आपले नावगाव लिहून दिले नि कलकत्त्याला आलात व काही मदत लागली तर अवश्य कळवा, असे सांगितले. राजेश्री सुमार दर्जाचे कवी होते. त्याने कलकत्त्याला जाऊन आपली कविता त्यांच्या पुढे सारून 'प्रवासी' या त्यांच्या बंगाली मासिकात छापावी अशी विनंती केली. पूर्व उपकाराचे स्मरणही दिले. रामानंद बाबूंनी कविता वाचली. अगदी शाळकरी रचना होती. 'आपली ही साहित्यकृती आमच्या उपयोगाची नाही. हवं तर मला पुन्हा गंगेत बुडवा. मी ही छापू शकत नाही!' असे त्यांनी सांगितले.

कथा उपदेश : आवळा देऊन कोहळा काढणे अथवा कोहळा दिला होता म्हणून आवळ्यावर हक्क सांगणे दोन्हीही गैरच.



## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | करण:विष्टि १६:१७:१५ |
| २९ जून २०२६ | करण:बव २९:२६:२६+ |
| सोमवार | सूर्य:मिथुन |
| विक्रम संवत्– २०८२ | चन्द्र:धनु०१:०८:३० |
| निज ज्येष्ठ शके | हिजरी सन् – १४४८ |
| संवत्– १९४८ | मुस्लिम मास – मोहरम |
| संवत्सर – पराभवनाम | तारीख – १३ |
| अयन– दक्षिणयन | विशेष |
| मास– निज ज्येष्ठ | निज ज्येष्ठ पौर्णिमा |
| ऋतु– सौर ग्रीष्म | वटपौर्णिमा |
| शुक्ल पक्ष | कबीर जयंती |
| तिथि:पूर्णिमा | ज्ञानेश्वर माऊली |
| २९:२६:२६+ | चाकरवाडीकर पुण्यतिथी |
| नक्षत्र:मूल २८:०३:२४+ | – चाकरवाडी (केज) |
| योग:शुक्ल १४:२५:३७ | |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ९९५

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | | | 3 | 7 | 8 | | 4 | |
| | | | | 6 | | | | 9 |
| | 6 | | | 9 | | 8 | 3 | 5 |
| | | 6 | | 4 | | | 7 | 8 |
| 7 | 8 | | | | | | 9 | 3 |
| 9 | 5 | | | 8 | | 6 | | |
| 4 | 9 | 1 | | 2 | | | 8 | |
| 3 | | | | 1 | | | | |
| | 7 | | 9 | 3 | 4 | | | 2 |

**: सूडोकु :**

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. ९९४ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 1 | 4 | 7 | 6 | 3 | 2 | 9 | 5 |
| 3 | 9 | 2 | 8 | 1 | 5 | 6 | 4 | 7 |
| 5 | 7 | 6 | 9 | 4 | 2 | 1 | 3 | 8 |
| 1 | 4 | 9 | 2 | 5 | 8 | 3 | 7 | 6 |
| 6 | 5 | 8 | 4 | 3 | 7 | 9 | 2 | 1 |
| 7 | 2 | 3 | 1 | 9 | 6 | 5 | 8 | 4 |
| 4 | 8 | 1 | 6 | 2 | 9 | 7 | 5 | 3 |
| 2 | 3 | 7 | 5 | 8 | 1 | 4 | 6 | 9 |
| 9 | 6 | 5 | 3 | 7 | 4 | 8 | 1 | 2 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- ११९४ – स्व्हेर नॉर्वेच्या राजेपदी.
- १६१३ – विल्यम शेक्सपियरच्या नाटकांचे प्रयोग जेथे झाले ते ग्लोब थियेटर आगीत भस्मसात.
- १८५० – कॅनडात व्हॅनकुवर द्वीपावर कोळसा सापडला.
- १८६८ – लंडनमध्ये प्रेस असोसिएशनची स्थापना.
- १८८० – ताहिती फ्रांसची वसाहत झाले.
- १८५५ – डेली टेलिग्राफ या लंडनस्थित वृत्तपत्राचा पहिला अंक प्रसिद्ध झाला. हे इंग्लंडचे राष्ट्रीय पातळीवरचे दुसरे वृत्तपत्र ठरले.

### राष्ट्रीय

- १९४५ – कॉंग्रेस आणि मुस्लिम लीग वादामुळे सिमला परिषद १५ दिवस पुढे ढकलली.
- १९७० – महाराष्ट्रातील नक्षलवादी नेत्या सुंदर नवलकर यांना अटक.
- १९८५ – अत्याधुनिक मिराज विमाने भारतीय हवाई दलात दाखल.

### जन्म

- १३९७ – जॉन दुसरा,अरागॉनचा राजाचा जन्म.
- १५९६ – गो–मिझुनू, जपानी सम्राटचा जन्म.
- १८६१ – विल्यम मेयो, अमेरिकन डॉक्टर व मेयो क्लिनिकचा स्थापकचा जन्म.
- १८६८ – जॉर्ज एलेरी हेल, अमेरिकन अंतरिक्षतज्ञचा जन्म.
- १८७१ – श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, मराठी नाटककार, विनोदकार, व वाङ्मय समीक्षकचा जन्म.

### निधन

- ००६९ – संत पीटरचे निधन.
- १२५२ – एबेल, डेन्मार्कचा राजाचे निधन.
- १८७३ – मायकेल मधुसूदन दत्त, बंगाली कवीचे निधन.
- १८७५ – फर्डिनांड पहिला, ऑस्ट्रियाचा राजाचे निधन.

## : SMS :

How Bollywood Proved That 2009 is not the End of Love.
?
?
?
?
?
By The Movie: "LOVE STORY 2050"

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३१.९ | २५.९ |
| अहमदनगर | ३२.९ | २४.३ |
| अकोला | ३९.६ | २७.३ |
| अमरावती | ४०.४ | २६.१ |
| बीड | ४३.३ | ३१.१ |
| भंडारा | ४३.१ | ३१.८ |
| बुलढाणा | ४६.२ | ३२.६ |
| चंद्रपूर | ४२.९ | ३२.४ |
| चेन्नई | ४१.६ | ३२.२ |
| नवी दिल्ली | ४६.२ | ३५.५ |
| धुळे | ३८.५ | २७.२ |
| गोंदिया | ४२.५ | ३१.२ |
| जळगाव | ३८.३ | २६.९ |
| कोल्हापूर | ३३.१ | २२.४ |
| लातूर | ३२.९ | २४.६ |
| मुंबई | ३८.६ | ३२.९ |
| नागपूर | ४२.५ | २९.९ |
| नांदेड | ३४.८ | २६.२ |
| नंदूरबार | ३७ | ३० |
| नाशिक | ३५.२ | २४ |
| पुणे | ३२.३ | २३.१ |
| पंढरपूर | ३३ | २६.६ |
| सातारा | ३४.२ | २१.६ |
| सांगली | ३४.६ | २३.२ |
| सोलापूर | ३६.३ | २६.२ |
| वर्धा | ४३.१ | २९.५ |



## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: उत्तर
आपले काम सेवा या भावनेने करा. आर्थिक परिस्थिती मजबूत राहील.

**तूळ :** शुभ रंग : पिवळा, शुभ दिशा: पूर्व
आज चांगल्या संधी आपणास मिळणार नाही. आर्थिक स्थिती चांगली राहील.

**वृषभ :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: उत्तर
भौतिक सुख साधनाकरिता आपला पैसा खर्च होईल. दुसऱ्यांचा सल्ला आपल्याकरिता फायदेशीर राहील.

**वृश्चिक :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा:पूर्व
निर्णय घेताना मर्यादा पाळा. कामकाजात अजचणी आल्यामुळे मन दु:खी राहील. निष्कारण शंकेमुळे बेचैन रहाल.

**मिथून :** मिथुन शुभ रंग: पांढरा: शुभ दिशा: पश्चिम
आपले धैर्य आपल्या कुटुंबात व समाजात मान सन्मान मिळवून देणार आहे.

**धनू :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा:पूर्व
पद, प्रतिष्ठेमध्ये वाढ होईल. मुलांच्या आरोग्याकडे लक्ष द्या. कोणत्यातरी रहस्याचा उलगडा होईल.

**कर्क :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: उत्तर
भावनेने निर्णय घेऊ नका नुकसान होण्याची शक्यता आहे. आपल्या कामाचे चिज होणार नाही.

**मकर :** शुभ रंग: लाल, शुभ दिशा: उत्तर
मनमिळावू स्वभावाचा आज आपल्याला फायदा होणार आहे. दुसऱ्यांची मदत फायदेशीर होईल.

**सिंह :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा:पूर्व
आपली आर्थिक स्थिती उत्तम राहील. व्यापार वाढीकरिता योग्य प्रयत्न करा. सार्वजनिक स्थितीची आपल्याला चिंता राहील.

**कुंभ :** शुभ रंग: केसरी : शुभ दिशा: पश्चिम
आजचा दिवस धावपळीचा राहील परंतु आर्थिक फायदा भरपूर होईल. आळस दूर करा.

**कन्या :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: उत्तर
भौतिक साधने मिळण्याचे योग आहेत. मान सन्मान वाढणार आहे. पैसा अधिक खर्च होईल.

**मीन :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: पश्चिम
आपल्या विचारांची दखल घेतली जाईल. अचानक लाभ होण्याचे योग आहेत.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ९९५



**आडवे शब्द**

१. अखबार
५. बाळाला झोपवताना म्हणण्याचा गीतप्रकार
९. नव्या कल्पना किंवा युक्ती लढविणारा, चतुर
११. योग्य, उचित
१२. विटी–दांडूच्या खेळातील खड्डा
१३. भावी काळासाठी केलेली तजवीज
१५. दरवाजा
१८. उथळ वाटी
१९. वडील
२०. गप्प राहण्यास सांगण्याची एक खूण
२३. धनी
२४. बारीक झणझण
२५. टरफल
२६. उषा नावाच्या चरित्र अभिनेत्रीचे आडनाव
२७. सूर्य
२८. नशा आणणारा पदार्थ
३०. वाळवी, उणीव
३१. छोटी लढाई
३३. समुद्रातील आग
३५. थकवा
३८. तिरळी
३९. प्रजा
४०. दोन संक्रांती ज्या महिन्यात येतात तो
४२. चेपणे, गप्प बसवणे
४३. पुरुष
४५. वजन वा दर्जाला कमी
४६. बातमी, हालहवाल
४८. नाशिकजवळून वाहणारी नदी
५०. याची कणसेदेखील हल्ली अमेरिकन लोकप्रिय
५१. नम्रता
५४. मध्यम प्रमाण
५६. बेढब, वेडेवाकडे
५८. अस्मादिक
५९. बत्त्याचा साथीदार
६०. उपासना करणारा, ६४. इथपासून आग मस्तकात जाते म्हणे!
६५. शेवट
६६. मनसोक्त
६८. हिचे हल्ली अफगाणी, चुणीदार असे नाना प्रकार!
७१. जाळे विणणारा कीटक
७२. माहेर सोडतना नववधूच्या डोळ्यात उभ्या राहणाऱ्या
७४. सदोदित
७५. पुराणकालीन महायुद्धाची कथा
७६. मोठा भाऊ
७७. चेहरा, मुख

**उभे शब्द**

१. धाक, भीती
२. मर्कट
३. अतिशयोक्ती करणे (वाक्य प्रचार)
४. त्रासलेला
५. शरीर
६. काजळाचा ठिपका, तीट
७. गाणे
८. आस लागून राहणे, झुरणे
९. रेशमी धोतर
१०. एकमेकाला सांगण्यातून सगळ्यापर्यंत पोचलेले
१४. नुकसान, झीज
१६. अनेकांचा सल्ला घेतल्यास होणारा कामातील बिघाड
१७. दर्पण
१९. लहान मूल
२०. महिला
२१. भांडखोर
२२. मिरचीचे तोंडीलावणे
२३. नारळाचे झाड
२६. त्रिभुवनात फिरणारा मुनी
२९. खिडकी, झरोका
३०. कुराणातील ेक
३२. रवाळ
३३. जमीनदार
३४. डोळे
३६. पार्वतीचे उग्र रूप
३७. परमेश्वर, कर्ता
४१. एकमेकांबरोबर काम करणारे
४१अ. सुख जवापाडे असेल तर हे मात्र डोंगराएवढे असते
४४. आवाज
४७. ठाशीत पण कुरूप, अभिरूचीहीन
४९. अस्वल
५०. चर्चा
५२. देवाशी केलेला करार
५३. मध्यभागी
५५. रक्षा
५७. अस्थिर, हालणारे
६०. प्रार्थना, आराधना
६१. पैंजण (हिंदी)
६२. गुणज्ञ
६३. पळून गेलेला
६५. आकडा, मांडी
६७. विश्वासघात
६९. पोथी गुंडाळण्याचे वस्त्र
७०. श्रीविष्णूच्या अवतारांची संख्या
७१. चंद्राची कड
७३. मोकळीक

**जम्बो शब्दकोडे क्र. ९९४ चे उत्तर**

आडवे उत्तर १. प्रभात फेरी ५. अंकल ७.विप्र ९.ठाकरे ११.मरवा १२.तपोबल १३.समज १४.आस १५.रपका १६.नरक १७. महाभारत २०.पावन २१.रमल २३.नरवर २४.डबलरोटी २७.रास २८.सलाम ३०.मग्न ३१.रपेट ३४.ठोक ३५.मरगळ ३७.आवकजावक ३९.मण ४०.मणेर ४२.खराब ४४.वर ४५.अनादि ४६.वरवर ४८.टणत्कार ४९.वामांग ५१.कडा ५२.मलूल ५४.परतपरत ५७.तळवा ५८.बालनट ६०.पथ ६१.रवा ६२.सर्जेराव ६४.ऐसपैस ६६.पर्वा ६७. मकरध्वज ६८.भाडेपट्टा ७०.आळ ७१.पैलतीर ७२.वरात ७३.भला ७४.सहसा ७५.उमर

उभे उत्तर : १.प्रमाद २.भार ३.तवा ४.रीतसर ५.अंबर ६.कलप ७.विम ८.प्रजनन ९.ठाणेकर १०.रेलचेल १३ अ.वर १४.आभार १७.मर १८.हावरट १९.तडस २०.पाटी २२.मळमळणे २३.नश्वर २५.रोखठोक २६.समर २७.रामावतार २९.लामणदिवा ३२.पेहराव ३३.सजावट ३६.गमनागमन ३८.वरणभात ३९.मना ४१.रसातल ४३.बरकत ४५.अरण्यवास ४७.वडाप ५०.आपपरभाव ५३.लूट ५५.रथ ५६.तरस ५८.बारामती ५९.लवकर ६३.अजगर ६४.ऐपत ६५.सट्टा ६६.पळस ६९.डेरा ७१.पैसा

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

# लोककलावंतांची आबाळ दूर करण्यासाठी शासनाने पुढाकार घ्यावा

## पहिल्या समरसता लोककला संमेलनाच्या अध्यक्षपदावरून पद्मश्री रघुवीर खेडेकर यांची मागणी



पुणे (दै. संध्या)

**तर प्रसंगी पद्मश्री परत करू :** या लोककला संमेलनाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार होते तर सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्यासह अन्य मान्यवरही या कार्यक्रमाला उपस्थित राहणार होते. मात्र, अचानक उद्भवलेल्या अन्य कार्यक्रमामुळे ते या कार्यक्रमाला येऊ शकले नाहीत. याबद्दल खेडेकर यांनी तीव्र संताप व्यक्त केला. लोककलावंतांच्या पदरी आजही उपेक्षाच पडत आहे. मुख्यमंत्री आणि त्यांचे सहकारी मंत्री पाच वर्ष त्यांच्या पदावर राहणार आहेत. त्यांना नेहमीच दिवस-रात्र काम असणार आहे. मात्र डोकं कलावंतांकडून अपेक्षा व्यक्त करताना त्यांची कैफियत ऐकून घेणे हे देखील त्यांचे कामच आहे. यापुढील एक महिन्याच्या कालावधी पुन्हा एकदा अशाच संमेलनाचे आयोजन मुख्यमंत्री व सांस्कृतिक कार्यमंत्री यांच्या उपस्थित करण्यात आले नाही तर आपण आपला पद्मश्री पुरस्कारही परत करू, असा इशारा खेडेकर यांनी यावेळी दिला.

समाजात समरसता वृद्धिंगत करण्याच्या कामात लोककलावंतांचा सहभाग वाढावा या उद्देशाने समरसता लोककला संमेलन आयोजित करण्याचा उपक्रम उल्लेखनीय असला तरी प्रत्यक्षात खुद्द लोक कलावंत अद्यापही उपेक्षितांचे जगणे जगत असून त्यांची आबाळ दूर करण्यासाठी शासनाने पुढाकार घेणे गरजेचे आहे, अशी आग्रही मागणी पहिल्या समरसता लोककला संमेलनाचे अध्यक्ष पद्मश्री रघुवीर खेडेकर यांनी केली.

लोककलावंतांच्या अडचणी शासनापर्यंत पोहोचाव्या, लोककलावंतांमध्ये विचारांचे आदान प्रदान व्हावे व विविध लोककलांचा रसिकांना परिचय व्हावा, या दृष्टीने राज्याचा सांस्कृतिक विभाग, सांस्कृतिक संचालनालय आणि समरसता साहित्य परिषद यांच्या वतीने या वर्षापासून समरसता लोककला संमेलन आयोजित करण्यात येत आहे. या पहिल्या संमेलनात ज्येष्ठ अभिनेत्री आणि लावणी नर्तिका मधू कांबीकर यांचा जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. प्रकृती अस्वस्थ असल्यामुळे त्या अनुपस्थित असल्याने त्यांच्या वतीने त्यांच्या भगिनी रत्ना कांबीकर यांनी स्वीकारला.

याप्रसंगी मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अविनाश आलेगांवकर, लोककलावंत नंदेश उमप, पद्मश्री वितहाबाई नारायनगावकर यांच्या कन्या मंगला बनसोडे, लीला गांधी, जयमाला इनामदार, सुरेखा पुणेकर, छाया आणि माया खुतेगावकर, राधा खुडे, बिग बॉस फेम अहिराणी गायक सचिन कुमावत, नृत्यांगना वैशाली जाधव, रेशमा मुसळे, अनिल मोरे, सांस्कृतिक कार्य संचालनायाच्या जान्हवी जानकर, वारकरी परिषदेचे अध्यक्ष विश्वनाथ गराडकर, भाजप शहराध्यक्ष आणि संमेलनाचे स्वागताध्यक्ष धीरज घाटे, संमेलनाचे आयोजक धनंजय खुडे, निलेश गद्रे, डॉ प्रसन्न पाटील आदि मान्यवर उपस्थित होते.

समाजात एकोपा वाढावा, विचारांची देवाण-घेवाण व्हावी, म्हणजेच सामाजिक समरसता! लोक कलावंत आपल्या कलेच्या माध्यमातून शतकानुशतके प्रबोधनाचे, सांस्कृतिक आदान प्रदानाचे आणि सलोखा निर्माण करण्याचे कार्य परंपरेने करीत आहेत. मात्र, लोक कलावंतांचे स्वतःचे जगणे अजूनही आव्हानात्मक स्वरूपाचे आहे, याकडे खेडेकर यांनी आपल्या भाषणात लक्ष वेधले.

शासनाच्या लोककलावंतांकडून असलेल्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी लोक कलावंत निश्चितपणे पुढे येतील. मात्र, लोककलावंतांकडे आजही गावकुसाबाहेर असल्याप्रमाणे बघितले जात आहे. आपली कला सादर करण्यासाठी गावोगाव फिरणाऱ्या कलावंतांना प्रस्थापितांकडून अन्याय सहन करावा लागतो. स्थानिक पोलिस आणि प्रशासन देखील कलावंतांच्या तक्रारींची दखल न घेता प्रस्थापितांची पाठराखण करतात. हे सर्व आम्हाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या कानावर घालायचे होते. मात्र, त्यांच्या अनुपस्थितीने आमची निराशा झाली, असे परखड मतही खेडेकर यांनी व्यक्त केले.

समाजात साहित्य आणि संस्कृतीच्या माध्यमातून समरसता निर्माण करण्याच्या दृष्टीने समरसचा साहित्य परिषद 25 वर्षापासून कार्यरत आहे. यावर्षीपासून आयोजित करण्यात येत असलेल्या समरसता लोककला संमेलनाचे स्वरूप केवळ उत्सवी नाही. लोककलावंतांच्या अडचणी सरकारपर्यंत पोहोचवण्याच्या दृष्टीने दुवा निर्माण करणे आणि समाज प्रबोधनाच्या प्रक्रियेत लोककलावंतांचा सहभाग वाढविणे, ही या आयोजनातील प्रमुख उद्दिष्ट आहेत. लोक कलावंतांचे हित साधण्यासाठी तसेच लोककलांचा उपयोग समाजासाठी करण्याच्या उद्देशाने संघटन उभे करण्याचे काम त्यांनी हाती घेतले आहे. हे संघटन विद्रोहासाठी नाही तर समाजाला आणि देशाला पुढे नेण्यासाठी आहे, असे समरसता साहित्य परिषदेचे कार्यवाह डॉ प्रसन्न पाटील यांनी आपल्या भाषणात सांगितले.

अहिराणी भाषा आणि खानदेशी लोककला यांच्या बद्दलची निष्ठा आणि त्याच्या विकासासाठी केलेले प्रामाणिक प्रयत्न यामुळेच आज शिखरा एवढ्या माणसांबरोबर बसण्याची संधी आपल्याला मिळाली, असे उद्गार बिग बॉस फेम अहिराणी लोककलावंत सचिन कुमावत यांनी काढले.

महाराष्ट्राच्या विविध विभागांमध्ये लोककलांचे मोठ्या प्रमाणावर वैविध्य दिसून येते. या परंपरा टिकवून ठेवणाऱ्या कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी शासनाकडून विविध उपक्रम केले जातात. हे संमेलन म्हणजे त्याच प्रयत्नांचा एक भाग असल्याचे संमेलनाचे स्वागताध्यक्ष धीरज घाटे यांनी सांगितले.

यावेळी जेष्ठ अभिनेत्री जयमाला इनामदार, लावणी सम्राज्ञी मंगला बनसोडे, कार्यक्रमाचे संयोजक आणि आघाडीचे लोक कलावंत धनंजय खुडे यांनीही मनोगत व्यक्त केले.

उद्घाटनाच्या सत्राची सुरुवात स्वरानुभव भजनी मंडळाच्या गणेश स्तवनाने झाली. फोक प्रबोधनच्या युवा वादकांनी सादर केलेल्या ढोल, ताशा, मृदुंग, डीमडीं, ढोलकी, डफ, पायपेटी आणि बासरी या पारंपारिक वाद्यांच्या जोशपूर्ण वादनाने संमेलनात चैतन्य निर्माण केले. शांती ब्रह्म गुरुकुलच्या वादकांनी पारंपारिक वारकरी पद्धतीने मृदंगवादन केले. उद्घाटन सोहळ्यापूर्वी महापालिका भवन ते बालगंधर्व रंगमंदिर अशी कलावंत दिंडी काढण्यात आली, तसेच कला दालनात विविध लोककला वाद्यांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते.

धनंजय खुडे यांनी प्रास्ताविक केले. अक्षय मोरे यांनी सूत्रसंचालन केले तर संमेलनाचे आयोजक निलेश गद्रे यांनी आभार मानले.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### शेअर बाजारातील गुंतवणुकीच्या आमिषाने ज्येष्ठाची 1.10 कोटींची फसवणूक

पुणे (दैनिक संध्या) : पुण्याच्या कोथरूडमध्ये पौड फाटा परिसरातील एक ज्येष्ठ नागरिक. वय वर्षे ७०! तीन महिन्यांपूर्वी त्यांच्या मोबाइलवर फोन आला. शेअर बाजारात गुंतवणूक करण्याच्या संधींची सविस्तर माहिती दिली. आणि, 'गुंतवणूक केली, तर उत्तम परतावा मिळेल,' असेही बोलणाऱ्याने सांगितले. विश्वास ठेवून ज्येष्ठ नागरिकाने तसे केलेही. आधी परतावा मिळाल्याचे भासवले गेले. नंतर लक्षात आले, की प्रत्यक्षात फसवणूक झाली आहे. किती? तब्बल एक कोटी रुपयांहून अधिक. शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने कोथरूड भागातील एका ज्येष्ठ नागरिकाची एक कोटी दहा लाख रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचा हा प्रकार नुकताच उघडकीस आला. या प्रकरणी सायबर पोलिसांनी चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एका ज्येष्ठ नागरिकाने शिवाजीनगर येथील सायबर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, सायबर चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार ७० वर्षीय ज्येष्ठ नागरिक हे सेवानिवृत्त झाले आहेत. पौड फाटा परिसरातील एका सोसायटीत ते राहतात. एप्रिल महिन्यात सायबर चोरट्यांनी त्यांच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधला. शेअर बाजारात गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळेल, असे आमिष चोरट्यांनी त्यांना दाखविले. त्यानंतर चोरट्यांनी शेअर बाजारात विविध गुंतवणूक योजना, तसेच मिळणाऱ्या परताव्याची माहिती त्यांना दिली. चोरट्याच्या आमिषाला ते बळी पडले. त्यानंतर चोरट्याच्या बँक खात्यात त्याने गेल्या तीन महिन्यांत वेळोवेळी एक कोटी दहा लाख रुपये जमा केले. पैसे जमा केल्यानंतर चोरट्यांनी त्यांना संदेश पाठविला. परतावा जमा झाल्याचे भासविले. मात्र, प्रत्यक्षात परतावा बँक खात्यात जमा करण्यात आला नव्हता. ज्येष्ठ नागरिकाने चोरट्यांच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधला. तेव्हा फसवणूक झाल्याचे उघडकीस आले.

### 'सिनीअर सिटीझन कार्ड'च्या आमिषाने ज्येष्ठाची फसवणूक

पुणे (दैनिक संध्या) : बँकेकडून ज्येष्ठ नागरिकांना ओळखपत्र देण्यात येणार असल्याची बतावणी करून सायबर चोरट्यांनी एका ज्येष्ठ नागरिकाची दहा लाख ३४ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला. याबाबत एका ज्येष्ठ नागरिकाने अलंकार पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार ७५ वर्षीय ज्येष्ठ नागरिक एरंडवणे भागात राहायला आहेत. सायबर चोरट्यांनी त्यांच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधून बँकेतून बोलत असल्याची बतावणी केली. ज्येष्ठ नागरिकांना बँकेकडून ओळखपत्र देण्यात येणार असल्याची बतावणी करून चोरट्यांनी त्यांच्या बँक खात्याची माहिती घेतली. चोरट्यांनी त्यांच्या बँक खात्यातून दहा लाख ३४ हजार रुपये काढून घेतले. पुणे शहरात एकूणच गुंतवणुकीच्या आमिषाने फसवणुकीच्या घटना वाढत आहेत एका डॉक्टर महिलेलाही अशाच प्रकारे नुकताच गंडा घालण्यात आला.

## केतन अग्रवाल प्रकरणानंतर विवाहपूर्व तपासणीची गरज अधोरेखित

- अनेक कुटुंबे फसवणूक आणि संकटांपासून वाचू शकतात : डिटेक्टिव्ह प्रिया काकडे
- विवाहपूर्व पार्श्वभूमी पडताळणी ही आता पर्याय नव्हे तर काळाची गरज!

पुणे (दै. संध्या)



पुण्यासह देशभरात चर्चेत असलेल्या केतन अग्रवाल खून प्रकरणानंतर विवाहपूर्व पार्श्वभूमी पडताळणी आणि भावी जोडीदाराची सत्य माहिती जाणून घेण्याचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे, असे प्रतिपादन स्विफ्ट डिटेक्टिव्ह अँड इन्व्हेस्टिगेशनच्या संचालिका डिटेक्टिव्ह प्रिया काकडे यांनी केले. पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. विवाहपूर्व तपासणी, विवाहबाह्य संबंध, वैवाहिक फसवणूक, आर्थिक गुन्हे, घटस्फोट आणि कौटुंबिक वाद यासंदर्भातील अनुभव त्यांनी यावेळी मांडले. प्रिया काकडे म्हणाल्या की, लग्न हा व्यक्तीच्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाचा निर्णय असतो. मात्र आजही अनेक कुटुंबे केवळ आर्थिक स्थिती, सामाजिक प्रतिष्ठा, शिक्षण किंवा बाह्य आकर्षण पाहून विवाह ठरवतात. भावी वधू किंवा वराचे पूर्वीचे संबंध, घटस्फोट, आर्थिक व्यवहार, गुन्हेगारी पार्श्वभूमी, मानसिक स्थिती किंवा इतर महत्त्वाच्या बाबींची पडताळणी केली जात नाही. त्यातून पुढे गंभीर कौटुंबिक व कायदेशीर समस्या निर्माण होतात. अलीकडील केतन अग्रवाल आणि राजा रघुवंशी यांसारख्या चर्चित घटनांनी समाजासमोर अनेक प्रश्न उभे केले आहेत. विवाहबाह्य संबंध, फसवणूक, जबरदस्तीने लावलेली लग्ने, खोटी माहिती देऊन जुळवलेले विवाह आणि आर्थिक स्वार्थातून निर्माण होणारे वाद यांचे प्रमाण वाढत असल्याचे निरीक्षण त्यांनी नोंदविले. "अनेक वेळा मुलगा किंवा मुलगी लग्नाबाबत इच्छुक नसतानाही सामाजिक दबावामुळे विवाह केला जातो. काही प्रकरणांमध्ये पूर्वीचे प्रेमसंबंध सुरूच असतात. त्याची माहिती लपवली जाते. परिणामी लग्नानंतर काही महिन्यांतच वाद, मानसिक छळ, घटस्फोट किंवा गुन्हेगारी स्वरूपाच्या घटना घडतात. योग्य वेळी पार्श्वभूमी पडताळणी केल्यास अशा अनेक घटना टाळता येऊ शकतात," असे काकडे यांनी सांगितले. त्यांनी सांगितले की, प्री-मॅट्रिमोनियल तपासणीमध्ये व्यक्तीची वैवाहिक स्थिती, पूर्वीचे विवाह किंवा घटस्फोट, आर्थिक व्यवहार, मालमत्ता, गुन्हेगारी नोंदी, सामाजिक वर्तणूक, व्यसनाधीनता, चालू संबंध आणि इतर महत्त्वाच्या बाबींची पडताळणी केली जाऊ शकते.

लग्नाच्या प्रक्रियेदरम्यान सतत टाळाटाळ करणे, संवाद टाळणे, वारंवार खोटी कारणे सांगणे, कुटुंबाशी संपर्क टाळणे किंवा लग्नाबाबत अनास्था दाखवणे हे महत्त्वाचे "रेड फ्लॅग्स" असल्याचेही त्यांनी नमूद केले. स्विफ्ट डिटेक्टिव्ह अँड इन्व्हेस्टिगेशनने २००६ पासून आजपर्यंत विवाहपूर्व पडताळणी, विवाहबाह्य संबंध, आर्थिक फसवणूक, कौटुंबिक वाद, बेपत्ता व्यक्तींचा शोध, मॅट्रिमोनियल फ्रॉड आणि कॉर्पोरेट तपास अशा 2,048 हून अधिक प्रकरणांचा यशस्वी तपास केला असल्याची माहिती त्यांनी दिली. "आमचा उद्देश केवळ कोणावर संशय घेणे नाही, तर वस्तुस्थिती समोर आणणे आहे. विवाहपूर्व योग्य माहिती मिळाल्यास अनेक कुटुंबांचे आर्थिक, मानसिक आणि सामाजिक नुकसान टाळता येते. सत्य माहितीच्या आधारे घेतलेला निर्णय हा नेहमीच सुरक्षित निर्णय ठरतो," असेही काकडे यांनी स्पष्ट केले. यावेळी विविध माध्यमांच्या प्रतिनिधींनी विवाहसंस्था, सोशल मीडियामुळे वाढणारे विवाहबाह्य संबंध, मॅट्रिमोनियल वेबसाइट्सवरील फसवणूक आणि न्यायालयीन कामकाजासाठी पुरावे संकलन यासंदर्भात विचारलेल्या प्रश्नांवर काकडे यांनी सविस्तर उत्तरे दिली.

## आईच्या मृत्यूच्या धक्क्याने तरुणाची आत्महत्या

पुणे (दै. संध्या)

रुग्णालयात उपचार घेणाऱ्या आईचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्यानंतर २२ वर्षीय मुलाने शनिवारी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना पर्वती दर्शन परिसरात घडली. ही घटना उघडकीस आल्यानंतर पर्वती दर्शन परिसरात शोककळा पसरली. मंदा गणेश दोडके आणि साहिल गणेश दोडके (वय २५, दोघे रा. पर्वती दर्शन) अशी मृत्युमुखी पडलेल्यांची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दोडके कुटुंबीय दांडेकर पूल येथे राहायला होते. तिथे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत नवीन इमारत बांधण्याचे काम सुरू आहे. नवीन इमारतीचे काम सुरू



झाल्यानंतर दोडके कुटुंबीयांनी पर्वती दर्शन परिसरात भाडेतत्त्वावर खोली घेतली. मंदा दोडके या ज्येष्ठ नागरिकांच्या शुश्रुषेचे काम करायच्या. दोडके यांना चार मुली आहेत. साहिल हा एकुलता एक होता.कुटुंबाला हातभार लावण्यासाठी तो सकाळी दूध पिशवी वितरणाचे काम करायचा; तसेच लिफ्ट दुरुस्ती, देखभाल करणाऱ्या व्यावसायिकाकडे तो काम करत होता.

## केतन अगरवाल हत्या प्रकरणात आरोपींची लोहगडावर नेऊन चौकशी

पुणे (दै. संध्या)

### पोलिसांकडून 'सीन रिक्रएशन'



केतन अगरवाल हत्या प्रकरणात केतनची नियोजित पत्नी सिया गोयल आणि तिचा प्रियकर चेतन चौधरी यांना रविवारी सकाळी लोहगडावर नेले आणि त्यांची चौकशी करण्यात आली. पोलिसांनी घडलेल्या घटनेची पुनर्रचना (सीन रिक्रएशन) केली. 'केतन अगरवाल हत्या प्रकरणात त्याची नियोजित पत्नी सिया आणि चेतन यांनी समाज माध्यमांवर माहिती शोधल्याचे पोलीस तपासात उघड झाले. सिया केतनला घेऊन १४ जूनला लोहगडावर गेली असताना, तिने केतनला दरीत ढकलून देण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, हा प्रयत्न अयशस्वी झाला. त्यामुळे तिने चेतनची मदत घेतली,' अशी माहिती तपासात मिळाल्याचे सूत्रांनी सांगितले. आरोपी चेतन आणि सिया वडगाव मावळ न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार सध्या पोलीस कोठडीत आहेत. दोघांना सोमवारपर्यंत (२९ जून) पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. आरोपी सिया गोयलच्या आई-वडिलांची शनिवारी लोणावळा ग्रामीण पोलिसांनी चौकशी केली. सियाच्या भावाची शुक्रवारीही चौकशी करण्यात आली होती. त्यानंतर तिच्या आई-वडिलांची शनिवारी चौकशी करण्यात आली. त्यानंतर रविवारी सकाळी सिया आणि चेतनला घेऊन पोलिसांचे पथक लोहगडावर गेले. घटनास्थळाची पाहणी पोलिसांनी केली. दोघांची घटनास्थळी चौकशी करण्यात आली. घटना नेमकी कशी घडली; तसेच घटनाक्रम काय होता, याची माहिती पोलिसांनी घेतली, अशी माहिती पोलिसांनी दिली.

केतन याचा सिया आणि चेतन यांनी १८ जून रोजी लोहगड किल्ल्यावरून दरीत ढकलून खून केला. याप्रकरणी अगरवाल कुटुंबीयांनी संशय व्यक्त केल्यानंतर पोलिसांनी तपास करून खुनाचा छडा लावला. पोलिसांना संशय येऊ नये याची दोघांनी काळजी घेतली होती.

# जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून लाभार्थ्यांना कर्जमुक्तीचा लाभ मिळणार

महाराष्ट्राची संपूर्ण अर्थव्यवस्था आणि संस्कृती ही कृषी क्षेत्राभोवती फिरते. परंतु, गेल्या काही वर्षांत निसर्गाचे चक्र पूर्णपणे बदलले आहे. कधी अवेळी येणारा पाऊस, कधी तीव्र दुष्काळ, तर कधी गारपीट, अतिवृष्टी आणि महापूर... एकामागून एक येणाऱ्या या नैसर्गिक संकटांमुळे राज्यातील बळिराजा पुरता कोलमडून गेला आहे. कर्जबाजारीपणाच्या गर्तेत अडकलेल्या या शेतकरी बांधवांना पुन्हा पायावर उभे करण्यासाठी राज्य शासनाने एक अत्यंत धाडसी आणि ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. ते म्हणजेच 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६'.ही योजना केवळ एक तात्पुरती कर्जमुक्ती नसून, आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकरी बांधवांना सन्मानाने जगण्याची आणि नव्या उमेदीने शेती करण्याची संधी देणारी 'नवसंजीवनी' ठरणार आहे.

**काशीबाई थोरात-धायगुडे (वरिष्ठ सहायक संचालक)**

**महाकर्जमुक्तीची अंमलबजावणी अंतिम टप्प्यात**

राज्य शासनाची आजवरची सर्वात मोठी महाकर्जमुक्ती योजना म्हणून या योजनेकडे पाहिले जात आहे. अत्यंत महत्त्वाचे म्हणजे, या योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी आता अंतिम टप्प्यात आली आहे. प्रशासकीय पातळीवर सर्व तयारी पूर्ण झाली असून, जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून पात्र शेतकऱ्यांच्या थेट कर्जखात्यांमध्ये कर्जमुक्तीची रक्कम जमा होण्यास सुरुवात होणार आहे.

या निर्णयामुळे खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर लाखो शेतकरी कुटुंबांना खूप मोठा दिलासा मिळणार आहे.

**योजनेचे त्रिसूत्र कर्जमुक्ती एकवेळा समजोता आणि प्रोत्साहनपर लाभ**

या योजनेचे स्वरूप केवळ कर्जमुक्ती नाही तर, विविध प्रवर्गातील शेतकऱ्यांचा विचार करून याची अत्यंत अभ्यासपूर्ण आखणी करण्यात आली आहे. यामध्ये प्रामुख्याने तीन घटकांचा समावेश आहे:

यात २ लाख रुपयांपर्यंत संपूर्ण कर्जमुक्ती: जे शेतकरी थकबाकीदार आहेत, अशा पात्र शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमुक्तीचा थेट लाभ दिला जात आहे. यापूर्वीच्या 'महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजने'चे लाभार्थी असलेल्या पात्र शेतकऱ्यांसाठीही शासनाने यात विशेष व स्वतंत्र तरतूद केली आहे.

एकवेळ समझोता योजना (OTS): ज्या शेतकऱ्यांची थकबाकी २ लाख रुपयांपेक्षा जास्त आहे, त्यांच्यासाठी 'वन टाईम सेटलमेंट' (OTS) म्हणजेच एकवेळ समझोता योजना लागू करण्यात आली आहे. यात शेतकऱ्यांनी आपल्या हिश्शाची रक्कम भरल्यानंतर, राज्य शासन कर्जमुक्ती रक्कम थेट शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात जमा करणार आहे.

नियमित कर्जफेड करणाऱ्यांना ५० हजारांचे प्रोत्साहन: अनेक शेतकरी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही बँकेच्या कर्जाची नियमित परतफेड करतात. अशा प्रामाणिक कर्जदार शेतकऱ्यांमध्ये अन्यायाची भावना निर्माण होऊ नये, म्हणून शासनाने त्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याचा स्तुत्य निर्णय घेतला आहे.

**डिजिटल तंत्रज्ञान आणि पारदर्शकता**

कर्जमुक्तीयोजनेच्या अंमलबजावणी मध्ये तांत्रिक अडचणी आणि दिरंगाई होऊ नये यास राज्य शासनाने 'महाआयटी'च्या माध्यमातून संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन आणि आधार क्रमांकावर आधारित ठेवली आहे.

सर्व बँकांकडून पात्र कर्जखात्यांचा तपशील थेट पोर्टलवर घेतला जात असून, संगणकीय पडताळणीद्वारे अंतिम याद्या तयार केल्या जात आहेत. या याद्या शेतकऱ्यांना सहज पाहता याव्यात यासाठी गाव चावडी, ग्रामपंचायत, बँक शाखा, विकास संस्था आणि आपले सरकार सेवा केंद्र येथे प्रसिद्ध केल्या जाणार आहेत. विशेष म्हणजे, पात्र शेतकऱ्यांना त्यांच्या नोंदणीकृत मोबाईलवर बँकांमार्फत संदेश पाठवूनही सूचित केले जाणार आहे.

**शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे आवाहन**

**आधार प्रमाणिकर अनिवार्य**

शेकऱ्यांनीयोजनेची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन, पारदर्शक आणि आधार क्रमांकावर आधारित ठेवण्यात आली आहे.पात्र शेकऱ्यांनी यादीत नाव आल्यानंतर लाभ मिळवण्यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या आधार नंबर किंवा यादीतील विशिष्ठ नंबरसह 'आपले सरकार सेवा केंद्रात' किंवा बँकेत जाऊन आपल्या कर्जखात्याचे बायोमेट्रिक/आधार प्रमाणीकरण करणे गरजेचे आहे. ही माहिती योग्य असल्याची खात्री करून शेतकऱ्यांनी मान्यता दिली, की शासनाकडून थेट कर्जमुक्तीची रक्कम शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात जमा होईल.

आणि एकवेळ समझोता (OTS) योजनेतील लाभार्थ्यांनी प्रथम त्यांचा हिश्शाची रक्कम भरणे आवश्यक आहे, त्यानंतरच शासनाचा कर्जमुक्तीचा लाभ शेकऱ्यांच्या कर्जखात्यात जमा होईल. यासाठी पात्र शेतकऱ्यांनी आधार प्रमाणिकरण करणे आवश्यक आहे.

**तक्रार निवारणासाठी सक्षम यंत्रणा**

योजनेच्या पारदर्शकतेवर शासनाने विशेष भर दिला आहे. कर्जखात्याच्या माहितीत किंवा बँक तपशीलात काही तांत्रिक त्रुटी असल्यास शेतकऱ्यांना दाद मागता यावी, म्हणून सक्षम तक्रार निवारण व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे. तसेच या तक्रारींचे तात्काळ निराकरण करण्यासाठी जिल्हास्तरावर विशेष समितीसुद्धा नियुक्त करण्यात आली आहे.

**प्रशासकीय समन्वय**

सहकार विभाग, जिल्हाधिकारी, बँका, महाआयटी, ग्रामपंचायती आणि स्थानिक प्रशासन या सर्व घटकांमध्ये राज्य शासनाने अचूक समन्वय साधला आहे. विविध स्तरांवर कर्मचाऱ्यांना विशेष प्रशिक्षण दिल्यामुळे ही संपूर्ण प्रक्रिया अत्यंत सुलभ आणि गतिमान झाली आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ च्या माध्यमातून राज्यातील लाखो शेतकरी पुन्हा एकदा 'कर्जमुक्त' होऊन 'कर्जपात्र' होणार आहेत. त्यांना नवीन पीक कर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून सुरू कर्जमुक्तीचा लाभ राज्याच्या कृषी अर्थव्यवस्थेला एक नवी गती, नवी ऊर्जा आणि बळिराजाला सन्मानाने जगण्याचा नवा विश्वास देणारा ठरणार आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### नेटफ्लिक्सचा लॉक अप : वरुण 'लैला' यादववर धक्कादायक आरोप केला



मुंबई (दैनिक संध्या) : इनमेट इंट्रो आणि पेअरिंगच्या दरम्यान सुफी मोटीवाला आणि वरुण यादव यांच्यात वाद झाला. त्यावेळी सुफीने एका अस्वस्थ करणाऱ्या घटनेबद्दल सांगितलं, जी त्याचं आणि वरुणचं पार्टीत घडली होती. सुफीने दावा केला की त्या पार्टीत वरुण यादवने त्याला त्रास दिला होता. ही धक्कादायक गोष्ट ऐकून सगळेच गोंधळले आणि थक्क झाले. त्या रात्री नक्की काय घडलं होतं? हे उघड करण्यामागचं कारण काय होतं? आणि जेव्हा सुफीने आपली बाजू मांडली तेव्हा खोलीतली प्रतिक्रिया कशी होती? लैला म्हणजेच वरुण यादवने यावर कसं उत्तर दिलं? हे सगळं सत्य तुम्हाला एपिसोडमध्येच उलगडताना पाहायला मिळेल. लॉक अप: सच या सज़ा मध्ये प्रत्येक कैद्याजवळ एक सत्य असतं, पण प्रत्येक सत्याला दोन बाजू असतात. लॉक अप: सच या सज़ा आता नेटफ्लिक्सवर स्ट्रीमिंग सुरू आहे. नवीन एपिसोड्स दर शनिवार ते बुधवार रात्री 8 वाजता पाहायला मिळतील.

### मेटाने ईशान्य भारतातील उद्योजकतेचा उत्साह प्रकाशझोतात आणला

मुंबई (दैनिक संध्या) : वर्ल्ड सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग डेच्या निमित्ताने आज मेटाने ईशान्य भारतातील लघु व्यवसाय मालकांना गुवाहाटी येथे एका महत्त्वपूर्ण कार्यक्रमासाठी एकत्र आणले, ज्यामध्ये त्यांच्या कथा प्रकाशझोतात आणल्या गेल्या आणि वाढीचे नवीन मार्ग उघडले गेले. या कार्यक्रमाला ईशान्य भारतातील जवळपास 350 व्यवसायांनी हजेरी लावली, ज्यातून या प्रदेशातील उद्योजकतेचा उत्साह अधोरेखित झाला. भारतामध्ये मेटा प्लॅटफॉर्म्स वापरणाऱ्या 92% पेक्षा जास्त व्यवसाय MSMEs आहेत. दररोज उद्योजक फेसबुक, इंस्टाग्राम आणि व्हॉट्सॲप वापरून ग्राहक शोधतात, ब्रँड तयार करतात आणि महसूल वाढवतात, अनेकदा मर्यादित संसाधने आणि छोट्या टीम्ससह. लघु व्यवसाय हे भारताच्या वाढीच्या कथेचे केंद्र आहेत. या कार्यक्रमात ईशान्य भारतातील उद्योजकांनी कसे स्केलेबल ब्रँड्स तयार केले, स्थानिक रोजगार निर्माण केले आणि त्यांच्या समुदायांमध्ये इनोव्हेशन घडवले हे अधोरेखित केले. स्थानिक ब्रँड्स, कारागीर, रिटेलर्स आणि क्रिएटर्स यांचा विविधतेने भरलेला समूह ईशान्य भारताच्या व्यवसाय समुदायाच्या वाढत्या महत्वाकांक्षेचे प्रतिबिंब दाखवतो. पूर्वी मर्यादित पोहोच असलेल्या या ब्रँड्सना डिजिटल टेक्नॉलॉजी आणि मेटा ॲड्सच्या मदतीने शोधले जाण्याची संधी मिळाली आणि भारतभर तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर विस्तार करण्याची संधी मिळाली. कृत्रिम बुद्धिमत्ता -पावर्ड टूल्स व्यवसायांना कॅम्पेन क्रिएशन ऑटोमेट करण्यास, परफॉर्मन्स सुधारण्यास आणि क्रिएटिव्ह ॲसेट्स पूर्वीपेक्षा जलद तयार करण्यास मदत करत आहेत. मेटाचे ॲडव्हान्टेज+ सूट आणि जनरेटिव्ह एआय क्रिएटिव्ह टूल्स सर्व आकाराच्या व्यवसायांसाठी ॲडव्हान्स्ड मार्केटिंग क्षमता अधिक सुलभ करत आहेत. वूलाह टीचे संस्थापक उपमन्यु बोरकाकोटी म्हणाले, "आम्ही गेल्या 4 वर्षांपासून मेटा ॲड्स चालवत आहोत. कृत्रिम बुद्धिमत्ता -पावर्ड फायदा + शॉपिंग कॅम्पेन वापरणे आमच्यासाठी गेम चेंजर ठरले. फक्त 6 महिन्यांत ॲडव्हान्टेज + शॉपिंग कॅम्पेनवर लक्ष केंद्रित केल्यानंतर आमच्या ऑर्डर्समध्ये 600% पेक्षा जास्त वाढ झाली. ईशान्य भारतातील लघु आणि मध्यम उद्योग साठी आयोजित या कार्यक्रमाचा भाग होऊन मला आनंद झाला आहे.

## झी टीव्हीवरील मालिकांनी जिंकले अख्ख्या भारताचे मन!

नवी दिल्ली (दै. संध्या) :




आजच्या काळात प्रेक्षकांमध्ये वास्तविक आणि भावनिकदृष्ट्या समृद्ध व प्रेरणादायी कथा पाहण्याची आवड वाढत आहे. महिलांवर आधारित कथा ह्या टीव्हीवरील प्रेक्षकसंख्येच्या वाढीमागील एक महत्त्वाची ताकद म्हणून समोर येत आहेत. या ट्रेंडचे उत्तम उदाहरण म्हणजे झी टीव्हीवरील मालिकांची श्रृंखला. 'गंगा माई की बेटियाँ', 'वसुधा', 'तुम से तुम तक' आणि 'जगद्धात्री' या मालिकांनी सातत्याने प्रेक्षकांचे प्रेम जिंकत टीआरपी चार्टवरही दमदार कामगिरी केली आहे. या यादीत आघाडीवर आहे 'गंगा माई की बेटियाँ', जी 1.8 टीव्हीआरसह पहिल्या क्रमांकावर प्रभावी कामगिरी करत आहे. या मालिकेचे भावनिक कथाकथन आणि चिकाटी व कौटुंबिक मूल्यांचे प्रभावी चित्रण देशभरातील प्रेक्षकांच्या मनाला भिडले आहे. दरम्यान, 'वसुधा'नेही स्वतःला टीव्हीवरील सर्वाधिक लोकप्रिय मालिकांपैकी एक म्हणून ठामपणे प्रस्थापित केले आहे. या मालिकेचे कथानक त्यातील मुख्य महिला व्यक्तिरेखेच्या ताकद, सन्मान आणि चिकाटीबद्दल असून ही मालिका प्रेक्षकांसोबत सातत्याने जोडली जात आहे आणि प्रत्येक आठवड्याला प्रेक्षकांची आवडती ठरत आहे. या वाढत्या ट्रेंडबद्दल आपले मत व्यक्त करताना 'वसुधा' ही भूमिका साकारणारी प्रिया ठाकूर म्हणाली, "मला वाटतं आजचे प्रेक्षक वास्तवाशी जोडलेल्या आणि भावनिकदृष्ट्या जवळच्या वाटणाऱ्या कथा शोधत आहेत.

# पहिल्या तीन स्पर्धकांची घोषणा

पुणे (दै. संध्या) :




प्रेक्षकांची उत्सुकता शिगेला पोहोचवणाऱ्या 'लॉक अप: सच या सजा' या नव्या रिॲलिटी शोची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. शोच्या प्रीमियरपूर्वी नेटफ्लिक्सने आयोजित केलेल्या विशेष पत्रकार परिषदेत पहिल्या तीन सेलिब्रिटी स्पर्धकांची घोषणा करण्यात आली. अभिनेता राम कपूर, लोकप्रिय टीव्ही अभिनेत्री शिवांगी जोशी आणि सोशल मीडिया सेन्सेशन पामेला सेरेना हे या शोमध्ये सहभागी होणार असल्याचे जाहीर करण्यात आले.

शोमध्ये एकूण १४ सेलिब्रिटी स्पर्धक सहा आठवड्यांसाठी एका खास 'लॉक अप'मध्ये राहणार आहेत. या काळात त्यांना विविध टास्क पूर्ण करत स्वतःचे अस्तित्व टिकवावे लागणार आहे. मात्र या खेळातील सर्वात मोठे शस्त्र ठरणार आहे 'सत्य'. स्पर्धकांची गुपिते, नाती, युती आणि संघर्ष यामुळे हा खेळ अधिक रंगतदार होणार आहे.

या कार्यक्रमाच्या पत्रकार परिषदेत निर्माती एकता कपूर, नेटफ्लिक्स इंडियाच्या कंटेंट विभागाच्या उपाध्यक्षा मोनिका शेरगिल, तसेच शोचे जेलर्स आणि होस्ट्स रितेश देशमुख व फराह खान उपस्थित होते. बालाजी टेलिफिल्म्स लिमिटेड आणि कोलोसियम यांच्या सहनिर्मितीत हा शो साकारला जात असून मलाया प्रधान कार्यकारी निर्माती म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत.

यावेळी बोलताना एकता कपूर म्हणाल्या, "गेल्या अनेक वर्षांत मी अनेक कार्यक्रम तयार केले आहेत. मात्र 'लॉक अप: सच या सजा' माझ्यासाठी विशेष आहे. हा शो स्पर्धकांना अशा परिस्थितीत ठेवतो, जिथे प्रत्येक निर्णयाचे परिणाम भोगावे लागतात. बाहेरील जगापासून पूर्णपणे दूर गेल्यानंतर त्यांचे खरे व्यक्तिमत्त्व समोर येते. हा फक्त रिॲलिटी शो नाही, तर एक सामाजिक प्रयोग आहे." मोनिका शेरगिल यांनी सांगितले की, "कॅप्टिव्ह रिॲलिटी हा प्रकार प्रेक्षकांना नेहमीच आकर्षित करतो. स्पर्धक दबावाखाली कसे वागतात, नाती कशी तयार होतात आणि संघर्ष कसा हाताळला जातो, हे पाहणे रंजक असते. 'लॉक अप'मध्ये मोठे डावपेच, प्रभावी व्यक्तिमत्त्वे आणि भावनांचा खरा खेळ पाहायला मिळतो. फराह खान आणि रितेश देशमुख यांची जोडी या शोसाठी अगदी योग्य ठरेल."

राम कपूर, शिवांगी जोशी आणि पामेला सेरेना यांच्या सहभागामुळे शोबद्दलची उत्सुकता आणखी वाढली आहे. आगामी दिवसांत आणखी स्पर्धकांची नावे जाहीर होणार असून 'लॉक अप'मध्ये कोणाचे गुपित उघड होणार आणि कोणाला शिक्षा मिळणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. 'लॉक अप: सच या सजा' हा शो २७ जूनपासून दर शनिवार ते बुधवार रात्री ८ वाजता नेटफ्लिक्सवर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे.

## गरजू विद्यार्थ्यांना वही वाटप; माजी विद्यार्थ्यांचा समाजोपयोगी उपक्रम दहाव्या वर्षात

भिवंडी (दै. संध्या) :




श्री सरस्वती विद्या मंदिर, नरदास नगर, भांडुप (पश्चिम) येथे शाळेच्या 1996–97 च्या माजी विद्यार्थी बॅचतर्फे गरजू विद्यार्थ्यांना वही वाटपाचा उपक्रम उत्साहात व आनंदी वातावरणात पार पडला. विशेष म्हणजे, हा समाजोपयोगी उपक्रम यंदा दहाव्या वर्षात प्रवेश करत असून, गेल्या दशकभरात शेकडो गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले आहे. या उपक्रमाची संकल्पना दहा वर्षांपूर्वी माजी विद्यार्थी बबन आमले यांनी मांडली होती. त्यानंतर नितीन चिलप, प्रशांत पराडकर, महेश राणे, निलेश तेली, राजेश घरवे आणि सरोज ठाकूर यांनी या संकल्पनेला पाठिंबा दिला. पुढे ही कल्पना सर्व माजी विद्यार्थी मित्र-मैत्रिणींसमोर मांडण्यात आली आणि सर्वांच्या उत्स्फूर्त सहकार्यामुळे हा उपक्रम सातत्याने सुरू राहिला.

यावर्षी माजी विद्यार्थ्यांच्या सहकार्याने सुमारे ३०० गरजू विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमासाठी रवींद्र कोचरेकर, सपना सुर्वे, दीपा म्हात्रे, दीपा पांचाळ, सचिन राजपूरकर, समीर तोडवलकर, स्मिता शिंदे, गीतांजली पालव, वैशाली शिंदे, सुभाष राऊत, विद्या सोनवणे, अजय पालव, मच्छिंद्र कळबे, रोहित गावडे, रोहन कळसुदकर, सचिन साळुंखे, संदेश आंबोणकर, शरद चिलप, कविता शिर्के, दीपक सुर्वे, अभिजित सावंत, दिगंबर भालेराव, सचिन गवांदे आणि विनायक मिस्त्री यांचे मोलाचे आर्थिक व सामाजिक सहकार्य लाभले.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे तथा याच शाळेचे माजी विद्यार्थी विशाल कडणे हे होते. त्यांनी माजी विद्यार्थ्यांनी गेल्या दहा वर्षांपासून सातत्याने राबविलेल्या या उपक्रमाचे कौतुक करत, समाजाप्रती असलेली ही बांधिलकी इतरांसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये शाळेच्या राणे मॅडम, गावंड सर, वाणी सर आणि गोळे मॅडम यांनीही मोलाचे योगदान दिले. त्यांच्या सहकार्यामुळे कार्यक्रमाचे नियोजन व अंमलबजावणी सुरळीतपणे पार पडली.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व देणगीदार, माजी विद्यार्थी, शिक्षकवृंद आणि सहकार्य करणाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले. भविष्यातही हा समाजोपयोगी उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

## वनप्लस नॉर्ड बड्स ४ सादर; प्रगत ध्वनीरोधक तंत्रज्ञानासह ५४ तासांची बॅटरी

पुणे (दै. संध्या) :




वनप्लसने आपल्या नॉर्ड मालिकेतील 'वनप्लस नॉर्ड बड्स ४' हे नवीन श्रवणयंत्र बाजारात आणले आहे. विद्यार्थी, तरुण व्यावसायिक आणि मनोरंजनप्रेमी ग्राहकांना लक्षात घेऊन विकसित करण्यात आलेल्या या उत्पादनात प्रगत ध्वनीरोधक तंत्रज्ञान, प्रभावी ध्वनीअनुभव आणि दीर्घकाळ टिकणारी बॅटरी देण्यात आली आहे. या श्रवणयंत्रांमध्ये ५२ डेसिबलपर्यंत बाह्य आवाज कमी करण्याची क्षमता देण्यात आली आहे. परिसरातील बदलत्या ध्वनीस्थितीनुसार ही यंत्रणा कार्यरत होत असल्याने गर्दीच्या ठिकाणी, प्रवासादरम्यान किंवा अभ्यासाच्या वेळी अधिक एकाग्रतेने संगीत आणि संभाषणाचा अनुभव घेता येतो. स्पष्ट संभाषणासाठी प्रत्येक श्रवणयंत्रात तीन अशा एकूण सहा ध्वनीग्राहकांचा वापर करण्यात आला आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता-आधारित प्रणालीच्या मदतीने वाऱ्याचा किंवा बाहेरील गोंगाटाचा परिणाम कमी करून संभाषणाची गुणवत्ता टिकवून ठेवली जाते, असा दावा कंपनीने केला आहे. ध्वनीगुणवत्तेसाठी १२ मिलिमीटर आकाराचे विशेष ध्वनीचालक बसविण्यात आले आहेत.

# उपमहापौर यांच्या हस्ते राष्ट्रीय पक्षी मोहिमेचा शुभारंभ

भिवंडी (दै. संध्या) :




भिवंडी महानगरपालिका हद्दीत आज राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेचा शुभारंभ भिवंडी शहराचे उपमहापौर मा. तारिक मोमीन यांच्या हस्ते इंदिरा गांधी मेमोरियल रुग्णालय येथे करण्यात आला. या कार्यक्रमास भिवंडी महानगरपालिकेचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. संदीप गाडेकर, ठाणे जिल्ह्याचे सर्व्हेलन्स मेडिकल ऑफिसर डॉ. अरुण काटकर, आरसीएच अधिकारी डॉ. वर्षा बारूड चौधरी, संबंधित परिसराच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. रुकैया कुरेशी तसेच नदी नाका हेल्थ पोस्टचे कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या आयोजनाची जबाबदारी हेल्थ पोस्टच्या कर्मचाऱ्यांनी पार पाडली.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर इंदिरा गांधी मेमोरियल रुग्णालयातील माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. यानंतर फीत कापून पल्स पोलिओ मोहिमेचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले.

यावेळी इंदिरा गांधी मेमोरियल रुग्णालयात मागील २४ तासांत जन्मलेल्या सर्व २१ नवजात बालकांना त्यांच्या आयुष्यातील पहिला पोलिओ प्रतिबंधक डोस देण्यात आला.

मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. संदीप गाडेकर यांनी सांगितले की, भिवंडी महानगरपालिका हद्दीतील ० ते ५ वर्षे वयोगटातील ७८ हजार ७५८ बालकांना पोलिओ प्रतिबंधक डोस देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यासाठी शहरभर ३७० पोलिओ बूथ तसेच ५१ ट्रान्झिट व मोबाईल पथके कार्यरत करण्यात आली आहेत. या मोहिमेसाठी एकूण १,२१२ अधिकारी व कर्मचारी नियुक्त करण्यात आले असून त्यांच्या देखरेखीसाठी ११० पर्यवेक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

ही पल्स पोलिओ मोहीम सकाळी ८.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सुरू होती. वृत्त लिहीपर्यंत सुमारे ५० टक्के बालकांना पोलिओचे डोस देण्यात आले होते. उर्वरित बालकांना पुढील पाच ते सात दिवसांत घरोघरी भेट देऊन पोलिओचे डोस दिले जाणार आहेत.

भिवंडी महानगरपालिकेने सर्व पालकांना आवाहन केले आहे की, आपल्या पाच वर्षांखालील प्रत्येक बालकाला पोलिओचे दोन थेंब अवश्य पाजावेत आणि पोलिओमुक्त समाजाच्या निर्मितीसाठी आरोग्य विभागास सहकार्य करावे.

# जैवविघटनशील घनकचऱ्यापासून २४ तासांत सेंद्रिय खताची निर्मिती

### शाश्वत कचरा व्यवस्थापनात मोठे पाऊल, कचऱ्यापासून पर्यावरण संरक्षण आणि समृद्धीकडे वाटचाल




**एसीसीएमए तंत्रज्ञानाचे वैशिष्ट्ये -**

१. जैवविघटनशील घनकचऱ्याचे २४ ते ३६ तासांत सेंद्रिय खतामध्ये रूपांतर.
२. कचऱ्याच्या प्रमाणात ८५ ते ९० टक्क्यांपर्यंत घट.
३. दुर्गंधी मुक्त आणि कमी मनुष्यबळावर चालणारी प्रणाली
४. जमिनीचा ताण, वाहतूक खर्च आणि कार्बन उत्सर्जनात घट होते
५. सेंद्रिय कार्बन आणि सेंद्रिय पोषकतत्तांमुळे जमीनीची पाणी धारण करण्याची क्षमता वाढते
६. मातीची सुपीकता वाढवून शाश्वत शेती आणि पर्यावरण संरक्षणाला मदत
७. स्वच्छ भारत व युनायटेट नेशन सस्टेनेबल गोलमध्ये देशाचा सहभाग वाढणार

पुणे (दै. संध्या) :

शहरे आणि गावांमध्ये दिवसेंदिवस वाढत असलेल्या जैवविघटनशील घनकचऱ्याचे व्यवस्थापन सध्या मोठी समस्या बनली आहे. या पार्श्वभूमीवर पेटंट प्राप्त मायक्रोब्सच्या सहायाने नियंत्रित अनएरोबिक कंपोस्टिंग (एसीसीएमए) तंत्रज्ञानाद्वारे कचऱ्यावर प्रक्रीया करणे हा त्याच्या व्यवस्थापन क्षेत्रात एक प्रभावी आणि शाश्वत पर्याय ठरला आहे. देशातील अशा प्रकारचे हे पहिलेच संशोधन आहे.

एव्हीके ग्रीन सोल्यूशन्स प्रा. लि. या पिनाक ग्रुपच्या उपकंपनीने विकसित केलेल्या अत्याधुनिक सेंद्रिय कचरा प्रक्रिया प्रकल्पाचे आणि सस्टेरा (Susterra) प्रा. लि. च्या पर्यावरण प्रयोगशाळेचे उद्घाटन शनिवारी खासदार मेधा कुलकर्णी, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, महापालिकेतील विरोधीपक्षनेते नगरसेवक ॲड. नीलेश निकम, नगरसेविका मंजूषा खर्डेकर यांच्या उपस्थित करण्यात आले. पिनाक ग्रुपचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक दिनेश चंद्रात्रे, डॉ. कीर्ती चंद्रात्रे, पर्यावरण सल्लागार मैथिली चंद्रात्रे-शेट्टी, मराठी बांधकाम व्यवसायिक संघटनेचे नितीन देशपांडे, मिलिंद देशपांडे यांच्यासह पिनाकचे पदाधिकारी नितीन नाईक, सुहास जोशी, हेमंत पिंपळे यावेळी उपस्थित होते. मैथिली यांनी या संशोधनाची पार्श्वभूमी यावेळी मांडली. अनुषा कुलकर्णी यांनी शहराचे घन घनकचरा व्यवस्थापन कसे असावे, याचे सादरीकरण केले.

जैवविघटनशील घनकचऱ्याचे सेंद्रिय खत निर्मिती यंत्र (OWC) असे या मशीनचे नाव आहे. केंद्र सरकारच्या घनकचरा व्यवस्थापन नियमावली २०२६ च्या निकषांची पुर्तता करणारा हा प्रकल्प आहे.

पारंपरिक कंपोस्टिंग प्रक्रियेसाठी अनेक आठवडे किंवा महिने लागतात, तर एसीसीएमए तंत्रज्ञान ही प्रक्रिया अत्यंत जलद आणि कार्यक्षम पद्धतीने २४ ते ३६ तासांत पूर्ण करते. या प्रक्रियेमुळे कचऱ्याचे उच्च-गुणवत्तेच्या सेंद्रिय खतामध्ये रूपांतर होते. हे तंत्रज्ञान गृहनिर्माण संस्था, हॉटेल्स, रुग्णालये, शैक्षणिक संस्था, उद्योग, मार्केट यार्ड, बागा, महानगरपालिका तसेच धार्मिक स्थळांमध्ये वापरता येते. मशीनद्वारे तयार होणारे सेंद्रिय खत मातीची सुपीकता वाढविण्यास मदत करते आणि रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी करते. त्यामुळे शाश्वत शेती आणि पर्यावरण संरक्षणाला चालना मिळते. यानिमित्ताने निसर्गाकडून घेतलेले मूलद्रव्य पुन्हा निसर्गात परत जातात, अशी माहिती चंद्रात्रे यांनी दिली. तेजस्विनी मसूरकर यांनी सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन केले.

सध्या पाषाण तलावाच्या कडेला बसविण्यात आलेल्या पाच टनाच्या ओडब्लूसी मशीनद्वारे दररोज जलपर्णीवर प्रक्रिया केली जात असून ७० किलो खत तयार होत आहे.

## जाहीर समन्स

सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (परसेवा)

**पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन लि.,पुणे**

बारामती विभागीय कार्यालय : मयुरेश्वर अपार्टमेंट्स पहिला मजला, भिगवण रोड, मु.पो. बारामती, ता. बारामती जि. पुणे. फोन (०२११२) २२९५३२

**इंदिरा महिला नागरी सहकारी पत संस्था मर्या सासवड - अर्जदार**

मार्केटयार्ड - सासवड, ता. पुरंदर जि. पुणे ४१२३०१

विरूध्द - जाब देणार

| अ. क्र. | प्रतिवादीचे नाव व पत्ता | प्रतिवादी क्र. | दावा क्र. | दावा रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|
| १ | **सौ. रेखा पुरूषोत्तम कुंभारकर**<br>मु. पो. उदाचीवाडी वनपुरी ता. पुरंदर, जि. पुणे | १ | १२४५/२६ | ३,५३,७३५/- |
| २ | **श्री. पुरूषोत्तम दत्तात्रय कुंभारकर**<br>मु. पो. उदाचीवाडी वनपुरी ता. पुरंदर, जि. पुणे | २ | १२४५/२६ | ३,५३,७३५/- |
| ३ | **श्री. गणपत मारूती लवांडे**<br>मु. पो. सिंगापुर, ता. पुरंदर, जि. पुणे | ३ | १२४५/२६ | ३,५३,७३५/- |
| ४ | **सौ. सविता शिवदास शितोळे**<br>मु. पो. वीर ता. पुरंदर, जि. पुणे | १ | १२४६/२६ | १,०२,९६८ |
| ५ | **श्री. शिवदास बाळासाहेब शितोळे**<br>मु. पो. वीर ता. पुरंदर, जि. पुणे | २ | १२४६/२६ | १,०२,९६८ |
| ६ | **श्री. अकुंश दत्तात्रय वचकल**<br>मु. पो. वीर ता. पुरंदर, जि. पुणे | ३ | १२४६/२६ | १,०२,९६८ |
| ७ | **श्री. दत्तात्रय बाळासाहेब शितोळे**<br>मु. पो. वीर ता. पुरंदर, जि. पुणे | ४ | १२४६/२६ | १,०२,९६८ |
| ८ | **सौ. रेश्मा विक्रम भोंडे**<br>मु. पो. सासवड साठेनगर ता. पुरंदर, जि. पुणे | १ | १२४७/२६ | १,६२,७३६/- |
| ९ | **श्री. विक्रम राजेंद्र भोंडे**<br>मु. पो. सासवड साठेनगर ता. पुरंदर, जि. पुणे | २ | १२४७/२६ | १,६२,७३६/- |
| १० | **श्री. अक्षय महादेव इनामके**<br>मु. पो. सासवड नेताजी चौक ता. पुरंदर, जि. पुणे | ३ | १२४७/२६ | १,६२,७३६/- |
| ११ | **सौ. मिनाक्षी दिगंबर तापेकर**<br>मु. पो. महात्मा फुले चौक सासवड ता. पुरंदर, जि. पुणे | १ | १२४८/२६ | १,६७,६६३/- |
| १२ | **श्री. विनोद दिगंबर तापेकर**<br>मु. पो. महात्मा फुले चौक सासवड ता. पुरंदर, जि. पुणे | २ | १२४८/२६ | १,६७,६६३/- |
| १३ | **श्री. पोपट बापुसाहेब चव्हाण**<br>मु. पो. लक्ष्मीमाता मंदिराजवळ भिवडी ता. पुरंदर, जि. पुणे | ३ | १२४८/२६ | १,६७,६६३/- |
| १४ | **श्री. संतोष आनंदा पाटील**<br>मु. पो. ३२० ड सोपान नगर सासवड ता. पुरंदर, जि. पुणे | ४ | १२४८/२६ | १,६७,६६३/- |

सदर दाव्याच्या कामी अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जातील प्रतिवादींना रजिष्टर पोस्टाने समन्स पाठविण्यात आलेले आहेत. परंतु प्रतिवादी यांना समन्स रूजु न झाल्याने त्यांचा नविन पत्ता उपलब्ध नसल्याने हे जाहीर समन्स देत आहेत.

उपनिर्दिष्ठ अर्जासंबंधी आपले म्हणने मांडण्यासाठी स्वतः जातीने **दिनांक १९/०६/२०२६ रोजी ११.३०** वाजता दाव्यासंबंधी कागदपत्रासह आपण या न्यायालयात हजर रहावे.

या नोटिसीद्वारे उपरोक्त प्रतिवादी यांना असेही कळविण्यात येते की वरील तारखेस आपण वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैर हजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी. त्याच प्रमाणे वरील तारखेस अगर तत्पुर्वी आपला संपुर्ण पत्ता कळविण्यास कसुर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

म्हणुन **आज दिनांक ०३/०७/२०२६** रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह हा जाहिर समन्स दिला आहे.

शिक्का

सही /-
(प्रगती वाबळे)
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (परसेवा)
पुणे जिल्हा नागरी सहकारी
पतसंस्थेचे फेडरेशन लि, पुणे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### वटपौर्णिमेनिमित्त अंघोळीची गोळी संस्थेच्या महिला टीमकडून वडाच्या वृक्षांचे वृक्षारोपण

पिंपरी (दैनिक संध्या) : वटपौर्णिमेचा सण पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत साजरा करत अंघोळीची गोळी महिला टीमने वडाच्या वृक्षांचे वृक्षारोपण केले. भारतीय संस्कृती आणि निसर्ग यांच्यातील अतूट नाते अधोरेखित करणारा हा उपक्रम उत्साहात पार पडला. "एक छोटासा प्रयत्न, एक मोठा बदल" या संकल्पनेवर आधारित हा वृक्षारोपण कार्यक्रम पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला होता. केवळ पारंपरिक पूजा आणि विधींपुरता वटपौर्णिमेचा उत्सव मर्यादित न ठेवता, महिला सदस्यांनी पर्यावरण संरक्षणासाठी प्रत्यक्ष कृती करण्याचा संकल्प केला. भविष्यात सावली, प्राणवायू आणि पर्यावरणीय लाभ देणाऱ्या वडाच्या रोपांची लागवड करून त्यांनी समाजासमोर एक आदर्श आम्ही महिलांनी निर्माण केला असे आंघोळीची गोळी संस्थेच्या शहर समन्वयक रेखा रांगोळे म्हणाल्या. यावेळी रावेत जॉगिंग ट्रॅक परिसरात ही झाडे लावण्यात आली. यावेळी भावना वाघचौरे,रुपाली वाघचौरे,रेखा कर्डीले,अरुणा मेने,आशा वाघचौरे ,सुनंदा तोडकर,सीमा नायक,रुचिता बंडी, निर्मला जगताप,पौर्णिमा कोल्हे, मृणाली डोईफोडे, आयुता रांगोळे, नीरजा देशपांडे,कमल मगर, गौरी गायकवाड आदी महिला उपस्थित होत्या.




### "जस्टीस फॉर केतन अग्रवाल".. गहुंजेतील लोढा सोसायटीत हजारोंचा कॅण्डल मार्च

पिंपरी (दैनिक संध्या) : लोहगड किल्ल्यावरून ढकलून केतन अग्रवाल याची हत्या झाल्याच्या प्रकरणाने संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडाली आहे. या प्रकरणात केतनची होणारी पत्नी सिया गोयल आणि तिचा प्रियकर चेतन चौधरी यांनी कट रचून खून केल्याचा आरोप असून, पुणे ग्रामीण पोलिसांनी दोघांनाही अटक केली आहे. या घटनेत निष्पाप बळी ठरलेल्या केतन अग्रवाल याला न्याय मिळावा आणि आरोपींवर कठोरात कठोर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी आज गहुंजे येथील लोढा बेलमोंडो सोसायटीतील हजारो रहिवाशांनी एकत्र येत भव्य कॅण्डल मार्च काढला. हातात मेणबत्त्या आणि न्यायाच्या घोषणा देत नागरिकांनी केतनच्या कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त केल्या. कॅण्डल मार्च दरम्यान नागरिकांनी या प्रकरणाचा जलदगतीने तपास पूर्ण करून आरोपींना कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी केली. तसेच अग्रवाल कुटुंबीयांना न्याय मिळवून देण्यासाठी समाजाने एकजूट दाखवली पाहिजे, असे मत अनेकांनी व्यक्त केले. यावेळी उपस्थित नागरिकांनी, "केतनला न्याय मिळालाच पाहिजे" आणि "दोषींना कठोर शिक्षा झाली पाहिजे" अशा घोषणा देत आपला संताप व्यक्त केला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, न्यायाच्या मागणीसाठी नागरिक मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरल्याचे पाहायला मिळाले. पुणे ग्रामीण पोलिसांकडून या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून, न्यायप्रक्रियेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### शिवछत्रपतींचा 353 वा शिवराज्याभिषेक सोहळा रायगड किल्ल्यावर उत्साहात साजरा



■ उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री भरतशेठ गोगावले, योगेश कदम यांच्यासह पिंपरी चिंचवडचे महापौर रवि लांडगे उपस्थित

पिंपरी (दैनिक संध्या) : छत्रपती शिवाजी महाराज यांचा तिथीप्रमाणे ३५३ वा शिवराज्याभिषेक सोहळा रायगड किल्ल्यावर उत्साहात साजरा करण्यात आला. उपमुखमंत्री एकनाथ शिंदे, रोजगार हमी मंत्री भरतशेठ गोगावले, गृहराज्यमंत्री योगेश कदम, महापौर रवि लांडगे यांनी यावेळी ध्वज फडकवून छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन केले. रायगड शिवराज्याभिषेक दिनोत्सव समिती आणि कोकणकडा मित्र मंडळ यांनी तिथीप्रमाणे आयोजित केलेल्या या शिवराज्यभिषेक सोहळ्यासाठी यावेळी रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे, रायगड पोलीस अधीक्षक आंचल दलाल आणि यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

*छत्रपती शिवाजी महाराजांचा शिवराज्याभिषेक हा केवळ ऐतिहासिक सोहळा नसून स्वराज्य, सुशासन आणि लोककल्याणकारी राज्यकारभाराचा प्रेरणादायी आदर्श आहे. रायगड ही प्रत्येक शिवभक्तासाठी प्रेरणास्थळी असून, येथे येऊन शिवरायांच्या कार्याला अभिवादन करण्याचे भाग्य लाभणे ही अभिमानाची बाब आहे. शिवरायांनी दिलेला शौर्य, पराक्रम, न्याय आणि सर्वसमावेशक प्रशासनाचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी आपली आहे.*

**– रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

### महापालिकेत बोगस पदव्यांवर पदोन्नती प्रकरण; तीन सदस्यीय समिती स्थापन

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड महापालिकेतील काही अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परराज्यातील विद्यापीठांतून मिळविलेल्या बोगस पदव्यांच्या आधारे वरिष्ठ पदावर पदोन्नती मिळविली आहे. त्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी आयुक्तांनी तीन सदस्यांची समिती स्थापन केली आहे. त्यामुळे बोगस पदव्यांच्या आधारे पदोन्नती घेतलेल्या अधिकाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. महापालिकेत वर्ग एक ते वर्ग चारच्या ११ हजार ५६१ जागा मंजूर आहेत. यामध्ये सध्या ६ हजार ८४२ जागांवर अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत. तर, ४ हजार ७१९ जागा रिक्त आहेत. महापालिकेच्या सेवा प्रवेश नियमावलीनुसार वर्ग तीन व चारमधील पात्र कर्मचाऱ्यांना वरच्या पदावर पदोन्नती देण्याचा नियम आहे. त्या नियमाच्या आधारे गेल्या दहा वर्षांत महापालिकेत रखवालदार, मजूर, गवंडी, बिगारी, शिपाई, लिपिक, आरोग्य निरीक्षक, सर्व्हेअर अशा कर्मचाऱ्यांना कनिष्ठ अभियंता, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकांसह विविध वरिष्ठ पदावर संधी देण्यात आली आहे. पदोन्नती मिळविताना अनेक कर्मचाऱ्यांनी कर्नाटक, आसाम, सिक्कीम, राजस्थान, केरळ या परराज्यातील विद्यापीठांच्या पदव्या घेतल्या आहेत. कर्मचाऱ्यांनी दूरस्थ पध्दतीने शिक्षण घेऊन या पदव्या मिळवल्या आहेत. विशेष म्हणजे विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी) आणि अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (एआयसीटीई) आदेशानुसार अभियांत्रिकीसह, वैद्यकीय, कृषी, आरोग्य, हॉटेल मॅनेजमेंट, कायदा आदींच्या दूरस्थ शिक्षणाला परवानगी नाही.

# नाशिक फाटा-खेड महामार्ग भूसंपादनासाठी निधी उपलब्ध करा

## आमदार महेश लांडगे यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मागणीचे निवेदन

पिंपरी (दै. संध्या)



पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावरील नाशिक फाटा ते खेड-राजगुरूनगर मार्गाच्या भूसंपादनासाठी राज्य सरकारकडून निधी उपलब्ध होईपर्यंत पिंपरी-चिंचवड महानगरपालिका (PCMC) आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (PMRDA) यांच्या माध्यमातून आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी आमदार महेश लांडगे यांनी केली आहे. याबाबत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे मागणी केली असून, महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी आणि पीएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांना सूचना केली आहे. पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्ग हा पुणे, पिंपरी-चिंचवड, चाकण आणि खेड-राजगुरूनगरसह औद्योगिक क्षेत्रांना जोडणारा महत्त्वाचा मार्ग आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी या मार्गाचे एलिव्हेटेड कॉरिडॉरमध्ये रूपांतर करण्याची घोषणा केली असून, त्यासाठी निविदा प्रक्रिया सुरू आहे. मात्र, भूसंपादनासाठी राज्य सरकारचा निधी अद्याप उपलब्ध न झाल्याने प्रकल्पाची अंमलबजावणी रखडल्याचे लांडगे यांनी नमूद केले आहे.

नाशिक फाटा ते चाकण आणि खेडदरम्यान वाढत्या नागरीकरणामुळे दररोज मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत आहे. अवघ्या ३० किलोमीटरच्या प्रवासासाठी दोन ते तीन तासांचा कालावधी लागत असून, नागरिकांचा वेळ आणि इंधन मोठ्या प्रमाणात वाया जात असल्याचे त्यांनी पत्रात म्हटले आहे.

भूसंपादनाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्यासाठी राज्य सरकारचा निधी मिळेपर्यंत PCMC आणि PMRDA यांनी त्यांच्या अर्थसंकल्पातून तात्पुरता निधी उपलब्ध करून द्यावा. राज्य सरकारचा निधी प्राप्त झाल्यानंतर तो संबंधित संस्थांना परत करता येईल, असा पर्यायही त्यांनी सुचविला आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील नाशिक फाटा ते खेड मार्गासाठी १ लाख २३ हजार ८४३ चौरस मीटर भूसंपादनाकरिता सुमारे २६२.७९ कोटी रुपयांची आवश्यकता आहे. तर PMRDA हद्दीतील १०.५०१३ हेक्टर क्षेत्राच्या भूसंपादनासाठी सुमारे २८८ कोटी रुपयांचा निधी लागणार असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर संबंधित विभागांना तातडीच्या सूचना देऊन PCMC आणि PMRDA यांच्या माध्यमातून भूसंपादनासाठी आवश्यक निधी उभारण्याबाबत कार्यवाही करावी, अशी विनंती आमदार लांडगे यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे. या निर्णयामुळे भूसंपादन प्रक्रियेला गती मिळून पुणे-नाशिक महामार्गाच्या रुंदीकरणाचे काम वेळेत पूर्ण होईल तसेच नागरिक, उद्योजक आणि औद्योगिक क्षेत्राला वाहतूक कोंडीतून मोठा दिलासा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

> "पुणे-नाशिक महामार्ग हा राज्यातील सर्वाधिक वर्दळीच्या आणि औद्योगिकदृष्ट्या महत्त्वाच्या मार्गांपैकी एक आहे. भूसंपादनासाठी निधीअभावी प्रकल्प रखडणे परवडणारे नाही. त्यामुळे राज्य सरकारचा निधी उपलब्ध होईपर्यंत PCMC आणि PMRDA यांनी तात्पुरता निधी उपलब्ध करून भूसंपादनाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी. या निर्णयामुळे प्रकल्पाला गती मिळेल, वाहतूक कोंडी कमी होईल आणि लाखो नागरिक, उद्योजक व औद्योगिक क्षेत्राला मोठा दिलासा मिळेल."
>
> **– महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

## 'अप्पू घर'चा चेहरामोहरा बदलणार

पिंपरी (दै. संध्या)



■ आधुनिक सुविधांसह पर्यटकांचे होणार स्वागत – स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे

पिंपरी-चिंचवड शहरातील अत्यंत लोकप्रिय पर्यटन स्थळ असलेल्या 'अप्पू घरा'चा लवकरच कायापालट करण्यावर आमचा भर असणार आहे. काळाची गरज ओळखून या ठिकाणी आधुनिक सोयी-सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. अप्पू घराच्या आधुनिकीकरणाचा मानस स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी व्यक्त केला आहे. या संदर्भात माहिती देताना सभापती अभिषेक बारणे म्हणाले की, "अप्पू घर हे सर्वसामान्यांसाठी पर्यटनाचे एक महत्त्वाचे केंद्र आहे. सध्याच्या महागड्या अम्युझमेंट पार्क्सच्या तुलनेत अप्पू घराचे तिकीट दर अत्यंत कमी आहेत. मात्र, गेल्या अनेक वर्षांपासून या ठिकाणी विशेष बदल झाले नव्हते. आता तेथील राईड्स आणि सुखसोयींचे आधुनिकीकरण करणे आवश्यक आहे." अप्पू घराच्या विकासकामांबाबत बोलताना बारणे यांनी स्पष्ट केले की, जरी सुविधा आधुनिक केल्या तरी त्याचे तिकीट दर सर्वसामान्यांच्या खिशाला परवडतील, अशाच प्रकारे ठेवले जातील. कामगारांच्या शहरात सामान्य नागरिकांना आनंदाचे क्षण अनुभवता यावेत, यासाठी हे दर मर्यादित ठेवण्यावर महापालिकेचा भर असेल. अप्पू घरासाठी २०३१ पर्यंत संबंधित कंत्राटदारावर करार करण्यात आला आहे. यामध्ये वॉटर पार्क आणि इतर नाविन्यपूर्ण प्रकल्पांचा समावेश आहे. सध्याच्या कामांचा आढावा घेताना बारणे म्हणाले की, "या प्रकल्पासाठी उपलब्ध असलेल्या निधीतून ऑक्टोबरपर्यंतची कामे वेगाने पूर्ण केली जातील. कामाचा दर्जा उत्तम असावा आणि पर्यटकांना एक दर्जेदार अनुभव मिळावा, यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत." अप्पू घराला पुनर्जीवित करून त्याला पुन्हा एकदा शहराचे 'दिमाखदार' आकर्षण म्हणून विकसित करण्याचा संकल्प सभापतींनी यावेळी व्यक्त केला.

## 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज विचार प्रबोधन पर्व' उत्साहात संपन्न

पिंपरी (दै. संध्या)




पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आयोजित दोन दिवसीय 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज विचार प्रबोधन पर्व २०२६ उत्साहात संपन्न झाले. २५ व २६ जून रोजी संभाजीनगर, चिंचवड येथील साई मंदिर उद्यानात आयोजित या प्रबोधन पर्वामध्ये राजर्षी शाहू महाराज यांच्या समतावादी, पुरोगामी आणि लोककल्याणकारी विचारांचा जागर विविध सांस्कृतिक, सामाजिक आणि प्रबोधनात्मक कार्यक्रमांच्या माध्यमातून करण्यात आला. प्रबोधन पर्वाचे उद्घाटन उपमहापौर शर्मिला बाबर यांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन करण्यात आले. यावेळी माजी महापौर मंगला कदम,नगरसदस्य कुशाग्र कदम, नगरसदस्या अनुराधा गोरखे, सुप्रिया चांदगुडे,उप आयुक्त अण्णा बोदडे,जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक,कोल्हापूर जिल्हा मित्र मंडळाचे अध्यक्ष पांडुरंग पाटील, कार्याध्यक्ष जगदीश परिट, सचिव सुनील पाटील, खजिनदार मिलिंद वेल्हाळ, उत्सव प्रमुख पी. वाय. पाटील आदी उपस्थित होते. त्यानंतर मे.जयेंदू मातोश्री प्रोडक्शन यांनी ७० कलाकारांसह सादर केलेल्या 'फोक संस्कृती' या बहुरंगी लोककला कार्यक्रमाने उपस्थितांची उत्स्फूर्त दाद मिळवली.

प्रबोधनपर्वाच्या दुसऱ्या दिवशी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंती निमित्त महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमधील छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेस तसेच के.एस.बी.चौक येथील पुतळ्यास उपमहापौर शर्मिला बाबर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. दूस-या दिवशी शहरातील दहावी व बारावी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केलेल्या १०० हून अधिक गुणवंत विद्यार्थ्यांचा शैक्षणिक साहित्य देऊन सत्कार करण्यात आला.


तसेच नगरसदस्य कुशाग्र कदम, उप आयुक्त अण्णा बोदडे यांच्या हस्ते मुख्य सोहळ्यात सामाजिक क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल उद्योजक सखाराम रेडेकर यांना प्रतिष्ठित 'शाहू महाराज पुरस्कार २०२६' प्रदान करून गौरविण्यात आले. तसेच पांडुरंग पाटील आणि संजय वडार यांना 'कोल्हापूर भूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सुनील गाडे, तानाजी भोसले, विठ्ठल मर्दाने, संजय व्हराबळे, दत्ता फासके, वर्षा विजय नाळे, अश्विनी लहू पाटील, योगिता विनायक रणसुभे, माधवी मिलिंद वेल्हाळ आणि धनश्री अक्षय पाटील यांना सामाजिक कार्यकर्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. तसेच युवराज मुळे, करण अनिल कारंडे आणि रेखाताई प्रकाश मुगडे यांना विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

> पुरस्कार वितरणानंतर 'गौरवशाली महाराष्ट्र' हा सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आला. महाराष्ट्राच्या समृद्ध लोकपरंपरा, संस्कृती आणि वारशाचे दर्शन घडविणाऱ्या या कार्यक्रमाला उपस्थितांनी भरभरून प्रतिसाद दिला. सायंकाळी साई मंदिर उद्यानात 'स्वर स्वामी' प्रस्तुत "वंदन- छत्रपती शाहू महाराजांना" या सांस्कृतिक कार्यक्रमाने शाहू महाराजांच्या कार्याला शाहिरी व गीतातून अभिवादन करण्यात आले.

## टी.ई.टी. पेपरफुटी प्रकरणी दोषींवर कठोर कारवाईची मागणी






### राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस (शरद पवार) आक्रमक

पिंपरी (दै. संध्या)

राज्यातील टी.ई.टी. आणि विविध भरती परीक्षांमधील कथित गैरव्यवहार व पेपरफुटी प्रकरणांमुळे विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ होत असल्याचा आरोप करत राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस (शरदचंद्र पवार) यांनी तीव्र निषेध व्यक्त केला आहे. संघटनेचे प्रदेशाध्यक्ष सुनील गव्हाणे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे राज्य सरकारकडे दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

सुनील गव्हाणे यांनी म्हटले आहे की, गेल्या काही वर्षांत टी.ई.टी., पोलीस भरती, शिक्षक भरती तसेच विविध स्पर्धा परीक्षांमध्ये झालेल्या गैरप्रकारांमुळे लाखो विद्यार्थ्यांचा विश्वास डळमळीत झाला आहे. परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता नसल्याने आणि वारंवार होणाऱ्या पेपरफुटीमुळे विद्यार्थ्यांना मानसिक, आर्थिक आणि शैक्षणिक नुकसान सहन करावे लागत आहे. राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसने राज्य सरकारवर टीका करत विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली आहे. केवळ चौकशीच्या घोषणा न करता दोषींना कठोर शिक्षा देऊन भविष्यात अशा घटना घडणार नाहीत याची खात्री करावी, असेही संघटनेने म्हटले आहे.

विद्यार्थी आणि पालकांमध्ये निर्माण झालेला असंतोष लक्षात घेऊन सरकारने तातडीने ठोस पावले उचलावीत, अन्यथा राज्यभर आंदोलन छेडण्याचा इशाराही राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसने दिला आहे.

**प्रमुख मागण्या**

- टी.ई.टी. आणि पेपरफुटी प्रकरणातील सर्व दोषींवर कठोर कारवाई करावी.
- पेपरफुटीशी संबंधित संपूर्ण साखळीचा शोध घेऊन दोषींना न्यायालयात उभे करावे.
- विद्यार्थ्यांचे नुकसान टाळण्यासाठी परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता आणि सुरक्षितता वाढवावी.
- भरती व स्पर्धा परीक्षा वेळेत, नियमित आणि विश्वासार्ह पद्धतीने घेण्यात याव्यात.
- विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणाऱ्यांविरोधात सरकारने शून्य सहनशीलतेचे धोरण अवलंबावे.

## इन्स्टाग्रामवर लग्नाचे आमिष दाखवून महिलेची लाखोंची ऑनलाईन फसवणूक

### सांगवी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

पिंपरी (दै. संध्या)

इन्स्टाग्रामवर ओळख झालेल्या एका व्यक्तीने लग्नाचे आमिष दाखवत आणि परदेशातून महागड्या भेटवस्तू पाठवल्याचे भासवून एका ३० वर्षीय महिलेची लाखो रुपयांची ऑनलाइन फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी सांगवी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी महिला या सांगवी परिसरात राहतात. १५ जून २०२६ पासून आरोपीने इन्स्टाग्रामद्वारे त्यांच्याशी संपर्क साधून मैत्री केली. त्यानंतर लग्नासाठी मागणी घालत विश्वास संपादन केला. आरोपीने परदेशातून ज्वेलरी, डायमंड, कपडे, फुटवेअर आणि आयफोनसह महागड्या वस्तूंचे पार्सल पाठविल्याचे सांगितले. यानंतर स्वतःला डीएचएल कुरिअर कंपनीचा कर्मचारी असल्याचे भासवणाऱ्या दुसऱ्या आरोपीने फिर्यादी महिलेशी संपर्क साधला.

पार्सल कस्टम ड्युटीमध्ये अडकल्याचे सांगून सुरुवातीला ५ लाख ३ हजार रुपये भरण्यास सांगितले. त्यानंतर पार्सल सोडविण्यासाठी आणखी ५ लाख ८० रुपयांची मागणी करण्यात आली. फिर्यादी महिलेने आरोपींच्या बोलण्यावर विश्वास ठेवून रक्कम भरल्यानंतर आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आले. याप्रकरणी अज्ञात आरोपींसह परदेशी मोबाईल क्रमांक वापरणाऱ्या व्यक्तींविरोधात भारतीय न्याय संहिता तसेच माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सांगवी पोलीस पुढील तपास करत आहेत.

# महापालिकेच्या भूखंड वाटप निर्णयाविरोधात काँग्रेस आक्रमक

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन

■ आकुर्डीतील डॉ. डी वाय पाटील संस्थेला मुदतवाढ देण्याचा मुद्दाही केला उपस्थित

पिंपरी (दै. संध्या)



पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सार्वजनिक उपयोगितेच्या भूखंडांचे खाजगी संस्थांना दीर्घ मुदतीच्या करारावर वाटप करण्याच्या निर्णयाविरोधात काँग्रेस पक्षाने तीव्र आक्षेप नोंदवला आहे. शहर काँग्रेसचे अध्यक्ष नरेंद्र बनसोडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदनाद्वारे हा निर्णय तत्काळ रद्द करण्याची मागणी केली आहे. पत्रात नमूद केल्यानुसार, महापालिकेच्या 15 जून 2026 रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत सार्वजनिक उपयोगितेचे भूखंड सुमारे 30 वर्षांच्या करारावर अत्यल्प भाडेदरात खाजगी संस्थांना देण्यास मंजुरी देण्यात आली. वाकड-पुनावळे परिसरातील प्रभाग क्रमांक 25 मधील माध्यमिक शाळेसाठी आरक्षित असलेली सुमारे 91 गुंठे जागा 'ईस्ट ऑक्सफर्ड इंटरनॅशनल फाउंडेशन' या संस्थेला भाडेतत्त्वावर देण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. काँग्रेसच्या म्हणण्यानुसार, सुमारे 63 कोटी रुपये बाजारमूल्य असलेल्या या भूखंडासाठी दरमहा केवळ 2 लाख रुपये भाडे आकारण्यात आले असून त्यामुळे महापालिकेच्या उत्पन्नाचे मोठे नुकसान होणार आहे. तसेच सदर जागेचा पूर्ण ताबा नसतानाही निविदा प्रक्रिया राबविण्यात आल्याचा आणि अटी-शर्ती सवलतीच्या स्वरूपात ठेवल्याचा आरोपही करण्यात आला आहे. वाकड-पुनावळे परिसरात वाढत्या शहरीकरणाच्या पार्श्वभूमीवर महापालिकेने स्वतःची शाळा उभारून गरीब व मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देणे अपेक्षित होते. मात्र त्याऐवजी कोट्यवधींचा भूखंड खाजगी संस्थेला देण्यात आल्याने सार्वजनिक हिताला तिलांजली दिल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. याशिवाय, कासारवाडीतील एक भूखंड महापौर रवी लांडगे यांच्या संस्थेशी संबंधित संस्थेला मंजूर करण्यात आल्याचा तसेच आकुर्डीतील डॉ. डी. वाय. पाटील संस्थेला मुदतवाढ देण्यात आल्याचा मुद्दाही पत्रात उपस्थित करण्यात आला आहे. काही प्रस्ताव उपसूचनांद्वारे मंजूर करण्यात आल्याने प्रक्रियेच्या पारदर्शकतेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. महत्त्वाचे विषय उपसूचनांद्वारे मंजूर करणे, सर्वसाधारण सभेचे थेट प्रक्षेपण बंद ठेवणे आणि सार्वजनिक मालमत्तेबाबत कथितपणे नफेखोर निर्णय घेणे हे स्थानिक स्वराज्य संस्थेतील लोकशाही मूल्यांना धक्का देणारे असल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे.

या सर्व प्रकरणांची चौकशी करून संबंधित भूखंड वाटपाचे निर्णय रद्द करावेत, अशी मागणी नरेंद्र बनसोडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### तालुक्यात 25 हजाराहून अधिक बालकांचे लसीकरण : डॉ. मनोज खोमणे

बारामती (दैनिक संध्या) : पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेअंतर्गत तालुक्यातील एकूण २६४ पोलिओ लसीकरण केंद्रावर पाच वर्ष वयोगटातील २५ हजार १३१ बालकांना सुमारे ९९ टक्के पोलिओ प्रतिबंधक लसीकरण करण्यात आले आहे, अशी माहिती तालुका आरोग्य अधिकारी डॉ. मनोज खोमणे यांनी दिली आहे. यावेळी तालुक्यातील या मोहिमेमध्ये सर्व आशा कार्यकर्त्या, अंगणवाडी कार्यकर्त्या आरोग्य कर्मचारी, समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सहायक, सहायिका व वैद्यकीय अधिकारी सहभागी होते.



### भिगवण पोलिसांच्या जाळ्यात शेतकऱ्यांचा मोटारी चोर अडकला

भिगवण (दैनिक संध्या) : उजनी धरणाच्या बॅकवॉटर परिसरात शेतकऱ्यांच्या पाणी उपसा मोटारींच्या केबल चोरीच्या वाढत्या घटनांमुळे शेतकरी चिंतेत असताना भिगवण पोलिसांनी केबल चोरी करणाऱ्या पाच जणांच्या टोळीचा पर्दाफाश केला. या कारवाईत चोरीच्या केबलसह चारचाकी वाहन असा ६ लाख ३३ हजार ६५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. भिगवण पोलीस ठाण्याचे प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ शेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली डिकसळ चौकीसमोर भिगवण-राशीन मार्गावर नाकाबंदी सुरू असताना पहाटेच्या सुमारास संशयित हुंदाई कार अडविण्यात आली. वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये विविध रंगांच्या सुमारे ९८१ मीटर कॉपर केबल आढळून आली. या प्रकरणी निलेश राजकुमार मोटे (खारघर), मनोज गुलाब बिंद, डब्लू बाबूलाल बिंद, विजयकुमार राशिंगार बिंद आणि विशाल शिवराज बिंद सर्व रा.सद्या गोपाळपट्टी शेवाळ वाडी फाटा मांजरी पुणे या पाच जणांना अटक करण्यात आली. आरोपींकडून १ लाख ३३ हजार ६५० रुपयांची केबल व ५ लाख रुपयांची कार असा एकूण ६ लाख ३३ हजार ६५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या संदर्भात भिगवण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, चौकशीदरम्यान आरोपींनी दौंड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील केबल चोरीच्या गुन्ह्याचीही कबुली दिल्याची माहिती पोलिसांनी दिली.



### चौदा बुथवर पल्स पोलिओ लसीकरण

जेजुरी (दैनिक संध्या) : जेजुरी येथील ग्रामीण रुग्णालयांच्या वतीने चौदा बुथवर राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिम राबविण्यात आली,या मोहिमेला पालक, भाविकांनी मोठा प्रतिसाद दिल्याचे जेजुरी ग्रामीण रुग्णालयाचे अधीक्षक डॉ प्रताप साळवे यांनी सांगितले. जेजुरीच्या ग्रामीण रुग्णालयात या राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेचे उद्घाटन जेजुरी नगर परिषदच्या आरोग्य विभागाच्या उपसभापती प्रज्ञा राऊत नगरसेविका नीलम सातभाई स्नेहल भालेराव, भक्ती कोरपड यांच्या उपस्थिती सुरू करण्यात आले. ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ प्रताप साळवे व सहा वैद्यकीय अधिक्षक विजय पवार, इन्चार्ज अधिपरिचारिका सोनल पवार आदी उपस्थित होते. या मोहिमे अंतर्गत 0 ते 5 वर्ष वयोगटातील लहान मुलांना पोलिओ डोस देण्यात आले जेजुरी शहर परिसरातील सुमारे 2992 बालके लसीकरण मोहिमे अंतर्गत अपेक्षित होते. जेजुरी बस स्टँड, रेल्वे स्टेशन ,ग्रामीण रुग्णालय , जेजुरी एम आय डी सी, जेजुरी गडाच्या पायथ्याशी नंदी चौक, ऐतिहासिक चिंचेची बाग, तसेच भाविकांच्या मुलांसाठी खंडोबा मंदिर आदी चौदा ठिकाणी बूथची व्यवस्था करणेत आलेली होती.

### मोफत रुग्णवाहिका सेवेने वाचवले दोन जणांचे प्राण

उरण (दैनिक संध्या) : पनवेल तालुक्यातील शिरढोण येथील साईकृपा हॉटेलजवळ आज सकाळी सुमारे ७:३० वाजण्याच्या सुमारास भीषण अपघात घडला. पेणच्या दिशेने जाणारी इको चारचाकी गाडी भरधाव वेगात असताना चालकाचा ताबा सुटल्याने गाडी रस्ता सोडून पलटी झाली. या अपघातात चालक दिनेश कुमार (वय ३५) व भुरा राम (वय २८) हे गंभीर जखमी झाले. दोघांनाही हात व पायाला गंभीर दुखापत झाली होती. अपघाताची माहिती मिळताच पळस्पे – कर्नाळा खिंड येथे २४ तास कार्यरत असलेली जगद्गुरु श्रीमद् रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या प्रेरणेने सुरू असलेली मोफत रुग्णवाहिका तात्काळ घटनास्थळी दाखल झाली. जखमींना त्वरित प्रथमोपचार देत त्यांना एम.जी.एम. हॉस्पिटल, कामोठे येथे सुरक्षित दाखल करण्यात आले. या सेवाकार्यात रुग्णवाहिका चालक विश्वास पाटील यांनी अत्यंत तत्परता व सेवाभाव दाखवत जखमींना वेळेत रुग्णालयात पोहोचवून मोलाची कामगिरी बजावली. विशेष म्हणजे, या विनामूल्य रुग्णवाहिका सेवेमार्फत आतापर्यंत तब्बल ३३,७८० अपघातग्रस्तांना वेळेत मदत मिळून त्यांचे प्राण वाचवण्यात आले आहेत. दरम्यान, रायगड जिल्ह्यातील कर्नाळा खिंड परिसरात विठ्ठल कामत हॉटेलजवळ महामार्गावर अपघातग्रस्तांच्या सेवेसाठी ही रुग्णवाहिका कायमस्वरूपी तैनात करण्यात आली असून, गरजू नागरिकांनी आपत्कालीन परिस्थितीत ८८८८२६३०३० / ८३२९४२५९०८ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. "तुम्ही जगा, दुसऱ्याला जगवा" या सेवाभावी संदेशासह ही मोफत सेवा नागरिकांसाठी जीवनदायी ठरत आहे.

### शिरूरच्या पिंपरखेड येथे एक लाख अठ्ठावीस हजारांच्या कॉपर केबलची चोरी

■ घोडनदी परिसरातील १६ शेतकऱ्यांच्या मोटारींच्या केबली लंपास; शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण

कवठे येमाई (दैनिक संध्या) : पिंपरखेड (ता. शिरूर) येथील घोडनदी पात्रालगत असलेल्या पाटीलवस्ती परिसरातून अज्ञात चोरट्यांनी तब्बल १६ शेतकऱ्यांच्या इलेक्ट्रिक मोटारींच्या कॉपर केबली चोरी करून नेल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.या प्रकरणी सोमनाथ बाळू बोंबे (वय ३३, रा. पिंपरखेड) यांनी शिरूर पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद दाखल केली आहे. दि.२६ जून २०२६रोजी सायंकाळी ५ ते २७ जून रोजी सकाळी ६ वाजण्याच्या दरम्यान ही चोरी घडली. चोरट्यांनी एकूण ४,२९० फूट लांबीच्या कॉपर केबली चोरी केल्या असून, चोरीस गेलेल्या मालाची किंमत १ लाख २८ हजार ७०० रुपये इतकी आहे.

## विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी पालकांचा निर्धार




हवेली (दै. संध्या)

नवीन शैक्षणिक वर्ष २०२६.२०२७ या वर्षातील पहिली पालक सभा शनिवार दिनांक २७/६/२०२६ रोजी पुरोगामी माध्यमिक विद्यालय नायगाव येथे खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.

या सभेत विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी करावयाच्या उपाययोजना निश्चित करण्यात आल्या. तसेच विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची सवय लागावी व परीक्षेची त्याची भिती दूर व्हावी म्हणून शासनाने आयोजित केलेल्या विविध परीक्षांना जास्तीत जास्त विद्यार्थी बसवावेत असे ठरले. विद्यार्थ्यांना स्वयंशिस्त लागावी यासाठी पालकांनी शिक्षकांबरोबर प्रयत्न करावे असे आवाहन केले. यावेळी पालकांमधून शाळा व्यवस्थापन समिती, विद्यार्थी सुरक्षा समिती, महिला तक्रार निवारण समिती, विद्यार्थी सुरक्षा समिती स्थापना करण्यात आल्या. शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष सौ वर्षा वाघमारे व सहसचिव सौ शिल्पा बिराजदार तसेच निवड झालेल्या विविध समित्यांच्या पदाधिकाऱ्यां संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सन्मान केला. या सभेचे अध्यक्ष पुरोगामी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष बाळासाहेब चोरघे यांनी सभेला संबोधित करताना सांगितले की विद्यार्थी हितासाठी आणि त्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी संस्था कुठेही कमी पडणार नाही.पालकांनी आपल्या पाल्याच्या उज्वल भविष्यासाठी सतत शाळेच्या संपर्कात राहून आपल्या पाल्याची प्रगती जाणून घ्यावी.या सभेस संस्थेचे सचिव रंगनाथ आप्पा कड उपाध्यक्ष रामदास चौधरी विश्वस्त दत्तात्रय चौधरी यांनी मार्गदर्शन केले. तर विद्यालयाच्या सहशिक्षिका सौ रोहिणी म्हेत्रे यांनी मुल्यमापन पद्धती, विविध स्पर्धा परीक्षेची माहिती दिली. या सभेस संस्थेचे विश्वस्त सोनबा चौधरी,ह.भ.प बाळासाहेब चौधरी, अनिल लोणकर, शिवाजी चौधरी, तुळशीराम चौधरी, सुनील चोरघे, तुळशीराम चौधरी सर्व शिक्षक,तसेच ३५६ पालक उपस्थित होते.सभेचे सुत्रसंचलन राजेश गोसावी यांनी केले प्रास्ताविक विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रवीण गायकवाड यांनी केले तर आभार दिलीप थोपटे यांनी मानले.



## राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचा शुभारंभ उत्साहात

कवठे येमाई (दै. संध्या)

शिरूर तालुक्याच्या पश्चिम भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र कवठे येथे राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचा शुभारंभ आज रविवार दि. २८ ला सकाळी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. बालकांना पोलिओ सारख्या गंभीर आजारापासून संरक्षण मिळावे आणि पोलिओमुक्त भारताचे स्वप्न अधिक बळकट व्हावे, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या मोहिमेची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते करण्यात आली.

या मोहिमेचा शुभारंभ कवठे येथील सामाजिक कार्यकर्ते पांडुरंग भोर, कवठे विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे चेअरमन श्री रितेश शहा तसेच माजी ग्रामपंचायत सदस्य डॉ. विकास शेटे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ बावस्कर, डॉ महाजन तसेच आरोग्य विभागातील सर्व कर्मचारी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी पोलिओ प्रतिबंधासाठी लसीकरणाचे महत्त्व अधोरेखित करत प्रत्येक पालकाने आपल्या पाच वर्षांखालील बालकांना पोलिओचे दोन थेंब देण्याचे आवाहन केले.

राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेअंतर्गत गावातील तसेच परिसरातील सर्व बालकांपर्यंत लसीकरण पोहोचविण्यासाठी आरोग्य विभागामार्फत विशेष नियोजन करण्यात आले असून, घरोघरी जाऊनही बालकांना पोलिओचे डोस देण्यात येणार आहेत.या मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी आरोग्य कर्मचारी, आशा सेविका, अंगणवाडी सेविका व ग्रामस्थांचे सहकार्य लाभत असून, सर्वांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## सात गावांत राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहीम; ४१४० बालकांना दोन थेंब

उरुळी कांचन (दै. संध्या)

आज प्राथमिक आरोग्य केंद्र उरुळी कांचन अंतर्गत सर्व गावांमध्ये राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहीम राबविण्यात आली.या मोहिमेसाठी उरुळी कांचन,या मोहिमेचे उदघाटन उरुळी कांचन ग्रामपंचायतीचे प्रशासक मिलिंद जगताप यांच्या शुभहस्ते पार पडले,याप्रसंगी माजी सरपंच भाऊसाहेब कांचन,माजी उपसरपंच संचिता कांचन,यशवंतचे संचालक संतोष कांचन,वैद्यकीय अधिकारी डॉ.सूर्यकांत हनमंते व डॉ.सागर नाशिककर आदी



मान्यवर उपस्थित होते.

उरुळी कांचन,भवरापूर,कोरेगाव मूळ,शिंदवणे,वळती,टिळेकरवाडी व खामगाव टेक या सात गावांमध्ये ठिकठिकाणी एकूण ३६ बूथचे नियोजन करण्यात आले होते. तसेच दोन ट्रांझीट टीम्स व एक मोबाईल टीम देखील होती. या मोहिमेअंतर्गत ० ते ५ वर्षे वयोगटातील एकूण ४४३७ बालकांपैकी ४१४० बालकांना पोलिओचे दोन थेंब पाजण्यात आले.

उर्वरित सर्व बालकांना दिनांक ३० जून ते २ जुलै या तीन दिवसांच्या कालावधीत घरोघरी जाऊन डोस पाजण्यात येतील. ही मोहीम राबविण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्राचे तीन सुपरवायझर्स,सर्व आरोग्य सेवक व सेविका,दोन गटप्रवर्तक व सर्व ३५ आशा स्वयंसेविका तसेच अंगणवाडी सेविकांचा सहभाग होता.प्राथमिक आरोग्य केंद्राचे प्रथम वैद्यकीय अधिकारी डॉ.मेहबूब लुकडे,द्वितीय वैद्यकीय अधिकारी डॉ.सूर्यकांत हनमंते व डॉ.सागर नाशिककर यांनी या मोहिमेचे संनियंत्रण केले.



## जेजुरी एमआयडीसीमध्ये तांब्याच्या तारा चोरणाऱ्या दोघांना अटक

जेजुरी (दै. संध्या)

जेजुरी एमआयडीसी मधील आर्यन कंपनीतील तांब्याच्या चोरी प्रकरणी पोलिसांनी दोघा चोरट्यांना ताब्यात घेतले असून आणखी तिघा चोरट्यांचा पोलिस शोध घेत आहेत. सदर गुन्ह्यातील आरोपी संदीप पांडुरंग मेमाने -वय ३६, शंकर अण्णा पवार वय -३४ दोघे रा-जेजुरी, ता- पुरंदर, जि- पुणे यांना पोलिसांनी अटक केली आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की जेजुरी औद्योगिक वाहतीतील आर्यन कंपनीत दिनांक 16 जून रोजी अज्ञात चोरट्यांनी तांब्याच्या तारा चोरून नेल्या होत्या. याबाबत जेजुरी पोलिस स्टेशन मध्ये तक्रार दाखल करण्यात आली होती.सी सी टीव्ही फुटेज व गोपनीय बातमीदारांच्या माहिती नुसार पोलिसांनी दोघा संशयितांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली असून त्यांचे आणखी तीन साथीदार गुन्हा करतेवेळी होते त्यांचा शोध सुरू आहे आरोपीं कडून चोरीस गेले 14 किलो तांबे जप्त केले असून सदरची कामगिरी पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर यांचे मार्गदर्शनाखाली ASI संतोष तोडकर, पोलीस हवालदार महेश खरात, विशाल भोरडे, अक्षय यादव, यांनी केली आहे. तांत्रिक विश्लेषणासाठी पोलीस हवालदार राजू मोमीन व अतुल डेरे यांचे सहकार्य मिळाले.

## राज्य मंडळाच्या महत्त्वाच्या समितीवर प्राचार्य नंदकुमार सागर यांची नियुक्ती

पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने नव्या शैक्षणिक धोरणाच्या (NEP) अनुषंगाने विविध समित्यांची पुनर्रचना केली असून, जेजुरी तालुका पुरंदर येथील जिजामाता हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज या विद्यालयाचे राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त प्राचार्य तथा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाचे राज्य सचिव प्राचार्य नंदकुमार सागर यांची "मंडळ अधिनियम व मंडळ नियमावली दुरुस्ती समिती" सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती राज्यातील शिक्षण क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण मानली जात आहे.



राज्य मंडळाचे सचिव डॉ. दीपक माळी यांनी जारी केलेल्या पत्रानुसार, नवीन शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी, परीक्षा प्रणालीतील सुधारणा तसेच मंडळाच्या अधिनियम व नियमावलीत आवश्यक बदल करण्यासाठी विविध समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. या समित्यांमध्ये शिक्षण क्षेत्रातील अनुभवी व अभ्यासू व्यक्तींना स्थान देण्यात आले आहे.

प्राचार्य नंदकुमार सागर यांनी राज्यभरातील मुख्याध्यापकांच्या शैक्षणिक, प्रशासकीय व संघटनात्मक प्रश्नांवर सातत्याने प्रभावी भूमिका बजावली आहे. त्यांच्या दीर्घ अनुभवाचा लाभ राज्य मंडळाच्या धोरणात्मक निर्णयप्रक्रियेत होणार असल्याची भावना शिक्षण क्षेत्रातून व्यक्त होत आहे.

या नियुक्तीबद्दल राज्यभरातील मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षणप्रेमी आणि विविध शैक्षणिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी प्राचार्य नंदकुमार सागर यांचे अभिनंदन केले असून, त्यांच्या माध्यमातून शालेय शिक्षण व्यवस्थेत सकारात्मक बदल घडतील, असा विश्वास व्यक्त केला आहे.तसेच प्राचार्य नंदकुमार सागर यांचे श्री.शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ सासवड या संस्थेच्या अध्यक्षा आनंदीकाकी जगताप, पश्चिम महाराष्ट्र भारतीय जनता पक्षाचे सरचिटणीस, संस्थेचे सचिव, मा. आमदार संजयजी चंदूकाका जगताप, संस्थेचे प्रमुख सल्लागार व आय ए.एस अधिकारी डॉ. राजेंद्रबापू जगताप, संस्थापक सचिव डॉ. एम. एस. जाधव, ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा व संस्थेच्या विश्वस्त राजवर्धिनीताई जगताप, भारती विद्यापीठाच्या संचालिका व संस्थेच्या विश्वस्त अस्मिता ताई जगताप, सहसचिव दत्तात्रय गवळी,संस्थेच्या समन्वयिका सोनालीताई शिंदे, व्यवस्थापक कानिफनाथ आमराळे, रवींद्रपंत जगताप यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## आंबेगाव तालुक्यात पल्स पोलिओ मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद

घोडेगाव (दै. संध्या)

आंबेगाव तालुक्यात पल्स पोलिओ मोहिमेला मोठा प्रतिसाद मिळाला .पहिल्याच दिवशी ९७% लसीकरण पूर्ण झाले असल्याची माहिती तालुका आरोग्य अधिकारी डॉक्टर तुषार पवार यांनी दिली. आंबेगाव तालुक्यामध्ये पल्स पोलिओ मोहिमेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. तुषार पवार यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील १५ हजार २६९ अपेक्षित बालकांपैकी तब्बल १५ हजार ६६ बालकांना (९७ टक्के) पहिल्याच दिवशी पोलिओचा डोस देण्यात आला. या मोहिमेचे उद्घाटन जुन्नर फाटा येथील बूथवर पंचायत समितीचे सभापती कैलासबूवा काळे



यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी पंचायत समिती आरोग्य विभागाचे वैभव जोशी, अनिकेत जाधव,गणेश आमले यांच्यासह आरोग्य कर्मचारी उपस्थित होते. तालुक्यातील ११ प्राथमिक आरोग्य केंद्रे, ४९ उपकेंद्रे आणि २४६ बूथच्या माध्यमातून ही मोहीम राबविण्यात आली. पहिल्या दिवशी डोस न मिळू शकलेल्या उर्वरित ३ टक्के बालकांसाठी पुढील ३ दिवस आरोग्य विभागामार्फत 'आयपीपीआय' (IPPI ) अंतर्गत घरोघरी जाऊन लसीकरण केले जाईल. आदिवासी भागात उपसभापती ज्योती पारधी यांनी लसीकरणाच्या ठिकाणी भेटी दिल्या.

## मोफत महिला शिवणकला प्रशिक्षण वर्गाचा समारोप

### महिलांना प्रमाणपत्र व उद्यम आधार कार्डचे वाटप

जुन्नर (दै. संध्या)

ग्रामीण भागातील महिलांना सक्षम, स्वावलंबी बनवण्यासाठी आणि त्यांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी जुन्नर तालुक्यात विविध उपक्रम राबवले जात आहेत. याच अंतर्गत शिंदे येथे आयोजित करण्यात आलेल्या ४० दिवसीय मोफत महिला शिवणकला प्रशिक्षण वर्गाचा समारोप सोहळा नुकताच अत्यंत उत्साहात संपन्न झाला.

हे प्रशिक्षण डिसेंट फाउंडेशन (पुणे), हायस्पीड स्किल हब (जुन्नर) आणि ग्रामपंचायत शिंदे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले होते.

ग्रामीण भागातील महिलांना शेती आणि मजुरीला पूरक म्हणून हक्काचा व्यवसाय सुरू



करता यावा, या उद्देशाने या ४० दिवसांच्या प्रशिक्षण काळात ब्लाऊजचे विविध आधुनिक प्रकार, मुलींचे ड्रेस, परकर, लहान मुलांचे फ्रॉक, फॅन्सी झगे यांसह शिलाई मशीनची किरकोळ दुरुस्ती व देखभाल कशी करावी, याचे परिपूर्ण तांत्रिक शिक्षण महिलांना देण्यात आले. प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केलेल्या सर्व महिलांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र आणि उद्यम आधार कार्डचे वाटप करण्यात आले. तसेच, या कार्यक्रमाचे औचित्य साधून डिसेंट फाउंडेशचे सदस्य उद्योजक बाळासाहेब सहादू खिलारी यांच्या वतीने आशा सुभाष खिलारी व

भाग्यश्री मधुकर खिलारी या दोन महिलांना स्वयंरोजगारासाठी शिलाई मशीन भेट देण्यात आल्या.

"ग्रामीण भागात शेती व मजुरी करणाऱ्या महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी स्वयंरोजगाराची निर्मिती करणारा हा उपक्रम अत्यंत स्तुत्य आहे.

या समारोप समारंभाला डिसेंट फाउंडेशनचे संस्थापक जितेंद्र बिडवई, हायस्पीड स्किल हबचे प्रमुख दिलीप भगत, डिसेंट फाउंडेशनचे सेक्रेटरी डॉ. फकीर आतार, सरपंच संतोष खिलारी, रसिका खिलारी, बाळासाहेब सहादू खिलारी, मेघनाथ जाधव , प्रशिक्षक छाया पाटील, आरती नाडेकर, चैताली केंगले,विठ्ठल खिलारी अक्षय कुटे ,योगेश वाघचौरे, श्रावण घोगरे ,यांसह गावातील मान्यवर, ग्रामस्थ व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सरपंच संतोष खिलारी यांनी केले, तर सूत्रसंचालन प्रसिद्ध निवेदक मेघनाथ जाधव यांनी केले.आभार विठ्ठल खिलारी यांनी मानले.

## राजुरीत मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर संपन्न

नारायणगाव (दै. संध्या)

राजुरी, ता. जुन्नर येथे (दि.२७ जून) रोजी उम्मत की खिदमत फाऊंडेशन, पुणे व रोटरी क्लब पुणे मिडटाऊन यांच्या संयुक्त विद्यमाने राजुरी येथील उम्मत की खिदमत फाऊंडेशनच्या कार्यालयात आयोजित करण्यात आलेले मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या पार पडले. या शिबिरामध्ये सुमारे ७५ नागरिकांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. तपासणीनंतर १३ रुग्णांमध्ये मोतीबिंदू आढळून आला असून, त्यांच्या मोफत शस्त्रक्रिया पुढील आठवड्यात तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येणार आहेत. ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार नेत्रसेवा सहज उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरास नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शिबिरामध्ये उपस्थित रुग्णांना



■ उम्मत की खिदमत फाऊंडेशन व रोटरी क्लब पुणे मिडटाऊन यांचा उपक्रम

डोळ्यांच्या आरोग्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले तसेच आवश्यक त्या पुढील उपचारांबाबतही सल्ला देण्यात आला. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी उम्मत की खिदमत फाऊंडेशनचे मुख्य प्रवर्तक गुलामनबी जोहरा युनूस शेख, मुख्य संयोजक मेहबूब काझी व मुबीन शेख यांनी विशेष पुढाकार घेतला. तसेच फाऊंडेशनचे स्वयंसेवक जिलानी पटेल, मुजम्मील पठाण, आरिफ पटेल आणि मोहसीन जमादार यांनी नियोजन, नोंदणी व रुग्ण व्यवस्थापनाची जबाबदारी अत्यंत तत्परतेने पार पाडून शिबिराच्या यशात मोलाचे योगदान दिले.



## थोडक्यात पण महत्वाचे



### वनमंत्र्यांची मोहोळ कुटुंबिया सोबत सांत्वनपर भेट

पुणे (दैनिक संध्या) : केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या वडिलांचे नुकतेच निधन झाले; आज राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी पुण्यातील कोथरूड येथे श्री. मोहोळ यांच्या निवासस्थानी भेट देत स्व. किसनराव मोहोळ यांच्या स्मृतींना विनम्र आदरांजली अर्पण करून मोहोळ कुटुंबियांचे सांत्वन केले. यावेळी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यासह कुटूंबीय उपस्थित होत्या.

### मला विमानात मुख्यमंत्री हतबल दिसले

पुणे (दैनिक संध्या) : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मला परवा विमानात भेटले. त्यावेळी मुख्यमंत्री हतबल दिसत होते. एवढा हतबल मुख्यमंत्री मी त्यादिवशी पाहिला, त्यांना कळत होतं पंख आपलेचं बॉस कापतायत. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचं काय झालं ते सुद्धा भाजप अध्यक्ष होते. पण नंतर काय इथेनॉलमध्ये पाणी टाकलं आणि त्यांचे पंख छाटले. आता नितीन गडकरी कुठेय?, असा शब्दात माजी मुख्यमंत्री आणि ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाजपवर निशाणा साधला. उद्धव ठाकरे आज परभणीच्या दौऱ्यावर आहेत. फुटीर खासदार संजय जाधव यांच्या मतदारसंघात उद्धव ठाकरेंनी शिवसैनिकांसोबत संवाद साधला. यावेळी उद्धव ठाकरेंनी संजय जाधव यांच्यासह भाजपवर जोरदार हल्लाबोल केला. आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील उद्धव ठाकरेंच्या विधानावर प्रतिक्रिया दिली आहे. ऑपरेशन टायगरच्या माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे पंख छाटण्याचं काम सुरु असल्याचं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं. तसेच मुख्यमंत्री मला जेव्हा विमानात भेटले, तेव्हा ते हतबल दिसले, असंही उद्धव ठाकरे म्हणाले. यावर देखील देवेंद्र फडणवीसांनी प्रतिक्रिया दिली. मला कुठले पंखच नाही, तर कोण माझे पंख कोण छाटणार?, असा प्रतिसवाल देवेंद्र फडणवीसांनी उपस्थित केला. माझेसोबत महाराष्ट्रातल्या 14 कोटी लोकांचा आशीर्वाद आहे. माझ्या वरिष्ठांचा आशीर्वाद आहे, असंही देवेंद्र फडणवीस म्हणाले. उद्धव ठाकरेंसोबतच्या एका विमानातील प्रवाशावरील प्रश्नावर उत्तर देताना देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले की, माझ्याकरता राजकीय प्रश्न गौण आहे. राजकीय प्रश्नांनी कुणाचंही भलं होणार नाही. सगळे प्रश्न विकासाने सुटणार आहेत. सर्व्हिस फ्लाईटमध्ये जर आम्ही योगायोगाने एकत्र बसलो तर त्यावर एवढ्या चर्चा का करायच्या?, असं वाटलं, आपण वेड्यांच्या बाजारात बसलोय का?, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# डिजिटल दंतचिकित्सा काँग्रेस २०२६ अंतर्गत उद्योग गोलमेज परिषद

## महाराष्ट्राला मौखिक आरोग्य सेवा क्षेत्रातील अग्रगण्य गुंतवणूक केंद्र बनविण्यासाठी शासन कटिबद्ध : डॉ. राजेश गवांदे

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्राला मौखिक आरोग्य सेवा क्षेत्रातील अग्रगण्य गुंतवणूक केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी शासन कटिबद्ध असून, परकीय थेट गुंतवणूक आकर्षित करण्याबरोबरच देशांतर्गत उद्योगांच्या विकासालाही प्रोत्साहन दिले जाईल, असे प्रतिपादन राजशिष्टाचार, परकीय थेट गुंतवणूक, प्रवासी भारतीय व्यवहार व जनसंपर्क विभागाचे सचिव तथा मुख्य राजशिष्टाचार अधिकारी डॉ.राजेश गवांदे यांनी केले. जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर, मुंबई येथे पार पडलेल्या 'महाराष्ट्र: मौखिक आरोग्य सेवा परिसंस्थेसाठी अग्रगण्य गुंतवणूक केंद्र' या विषयावरील गोलमेज परिषदेत ते बोलत होते.

या परिषदेत देश-विदेशातील दंतवैद्यकीय उद्योग क्षेत्रातील आघाडीच्या कंपन्या, तज्ज्ञ, धोरणकर्ते आणि शासनाचे वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले. भारतीय दंतचिकित्सा संघटनेचे अध्यक्ष डॉ. मनोज श्रीवास्तव, उपमुख्यमंत्री कार्यालयाचे संयुक्त सचिव व धोरणात्मक सल्लागार डॉ. संतोष भोसले, भारतीय दंतचिकित्सा संघटनेचे मानद सरचिटणीस डॉ. अशोक ढोबळे, मौखिक आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञ तसेच उद्योग व व्यापार क्षेत्रातील प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते. गोलमेज परिषदेत सहभागी मान्यवरांना संबोधित करताना डॉ. गवांदे




म्हणाले, दंत उपचारांसाठी अधिक व्यापक विमा कव्हरेज उपलब्ध करून देण्यासाठी इंडियन डेंटल असोसिएशनने पुढाकार घेऊन खाजगी विमा कंपन्यांशी संवाद साधावा. दंत उपचारांना विमा संरक्षण मिळाल्यास नागरिकांचा उपचारांकडे कल वाढेल आणि उद्योगाला नवी बाजारपेठ निर्माण होईल, असे त्यांनी नमूद केले.

या क्षेत्रासाठी कौशल्यविकास आणि मनुष्यबळ निर्मितीचा विचार करता, महाराष्ट्र शासनाकडे स्वतंत्र कौशल्यविकास विभाग तसेच प्रशिक्षण सुविधा उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले. उद्योगाकडून आवश्यक कौशल्ये, प्रशिक्षणाची संरचना आणि उपकरणांची मागणी स्पष्ट झाल्यास तीन महिन्यांचे अल्पकालीन प्रशिक्षण अभ्यासक्रम राबवून दंत उद्योगाला 'इंडस्ट्री रेडी' मनुष्यबळ उपलब्ध करून देता येईल, असेही त्यांनी सांगितले.

'इझ ऑफ डुइंग बिझनेस' आणि विविध प्रोत्साहन योजनांबाबत उद्योग प्रतिनिधींनी मांडलेल्या सूचनांचा उल्लेख करताना डॉ. गवांदे म्हणाले, 'मैत्री' पोर्टलमुळे परवानग्या, मंजुरी आणि सुलभ व्यवसायासाठीचा प्रशासकीय मार्ग मोठ्या प्रमाणात सुलभ होईल. दंत उद्योगाला स्वतंत्र उद्योग म्हणून प्रोत्साहनांच्या परिघात आणण्याचा मुद्दा मांडताना डॉ गवांदे म्हणाले, या संदर्भात आयडीएने उद्योग विभागाशी सविस्तर चर्चा करून एकत्रित प्रस्ताव तयार करावा. उत्पादन युनिट्स भारतात, विशेषतः महाराष्ट्रात सुरू करण्यास शासन इच्छुक असून, यासाठी स्वतंत्र बैठक घेऊन पुढील रोडमॅप तयार करण्यात येईल, अशी माहिती त्यांनी दिली. उद्योग, इंडियन डेंटल असोसिएशन आणि महाराष्ट्र शासन यांच्या समन्वयातून मौखिक आरोग्य, दंत उत्पादन निर्मिती, संशोधन, कौशल्यविकास आणि वैद्यकीय पर्यटनाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास डॉ गवांदे यांनी यावेळी व्यक्त केला.

तत्पूर्वी, महाराष्ट्र शासनाच्या राजशिष्टाचार विभागाचे अवर सचिव अविनाश सोलवट यांनी या परिषदेचे प्रास्ताविक केले. ते म्हणाले, महाराष्ट्र हे देशातील सर्वात प्रभावशाली राज्य आणि जागतिक भांडवल तसेच नवोन्मेषाचे महत्त्वाचे केंद्र आहे. मौखिक आरोग्याच्या क्लिनिकल सेवा, शिक्षण, संशोधन, उत्पादन आणि डेंटल टुरिझम यांचा समावेश असलेला सर्वसमावेशक 'ओरल हेल्थकेअर इकोसिस्टम' उभारण्याचा संकल्प त्यांनी यावेळी मांडला. इंडियन डेंटल असोसिएशनचे मानद सरचिटणीस डॉ. अशोक ढोबळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

या बैठकीत हेलिऑन – सेन्सोडाईन, कोलगेट-पामोलिव्ह, युनिकॉर्न डेनमार्ट लिमिटेड, ड्यूर डेंटल इंडिया प्रा. लि., डेंट्सप्लाय सिरोना इंडिया प्रा. लि., शोफू डेंटल इंडिया प्रा. लि., डेंटल प्रॉडक्ट्स ऑफ इंडिया (डीपीआय), मेकओ – टूथसी, क्रोमाडेंट डेंटल इक्विपमेंट्स, प्रॉमिस डेंटल सिस्टिम, आदी मेड प्रायव्हेट लिमिटेड, पिडिलाइट विझडेंट, प्रिव्हेस्ट डेनप्रो लिमिटेड, सेलाडेंट आदी संस्थांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते.

यावेळी उपस्थित उद्योजक कंपन्यांच्या प्रतिनिधींनी आपल्या संस्थेची माहिती दिली. महाराष्ट्रात गुंतवणूक आणि व्यवसाय वृद्धीसाठी शासनाच्या सकारात्मक भूमिकेचे कौतुक करून येथे गुंतवणुकीसाठी उत्सुक असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

# कृषी दिनानिमित्त राज्यस्तरीय कृषी पुरस्कार प्रदान सोहळा २०२६

■ मुंबई (दै. संध्या)

■ एकूण १८९ पुरस्कारार्थ्यांचा होणार गौरव : कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

हरित क्रांतीचे प्रणेते आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त साजऱ्या होणाऱ्या कृषी दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत दिनांक १ जुलै २०२६ रोजी डोम, सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियम, वरळी, मुंबई-१८ येथे राज्यस्तरीय कृषी पुरस्कार प्रदान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात सन २०२३ व २०२४ या वर्षातील राज्यस्तरीय कृषी पुरस्कारांचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार असून कृषी, कृषि संलग्न क्षेत्र, फलोत्पादन, सेंद्रिय शेती, कृषी विस्तार व कृषी विकास क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या एकूण १८९ शेतकरी, संस्था व कृषी अधिकारी-कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात येणार असल्याची माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली आहे.

या पुरस्कार सोहळ्यास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा पवार, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, रोजगार हमी, फलोत्पादन मंत्री भरतशेठ गोगावले, कृषी राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, राज्यमंत्री (मृद व जलसंधारण) इंद्रनील नाईक व इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत. राज्यातील कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार, उत्पादनवाढ, शाश्वत शेती, सेंद्रिय शेती, फलोत्पादन आणि कृषी विस्तार क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा गौरव करण्यासाठी हे पुरस्कार प्रदान करण्यात येतात. कृषी क्षेत्रातील उत्कृष्टतेचा सन्मान करून इतर शेतकऱ्यांना प्रेरणा देणे हा या पुरस्कारांचा मुख्य उद्देश आहे. यामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्कार, वसंतराव नाईक कृषिभूषण पुरस्कार, जिजामाता कृषिभूषण पुरस्कार, कृषिभूषण (सेंद्रिय शेती) पुरस्कार, वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार, युवा शेतकरी पुरस्कार, उद्यानपंडित पुरस्कार, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार(सर्वसाधारण गट/आदिवासी गट) तसेच पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार (आयुक्तालय/मंत्रालय स्तर) या विविध पुरस्कारांचा समावेश आहे. राज्यभरातील पुरस्कारार्थी, त्यांचे कुटुंबीय, कृषी अधिकारी, कृषी तज्ज्ञ आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न होणार असून महाराष्ट्राच्या कृषी विकासात मोलाचे योगदान देणाऱ्या कृषी क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींचा हा सन्मान सोहळा ठरणार आहे.

# महाराष्ट्रात दंत आरोग्य व दंत पर्यटन क्षेत्रात जागतिक केंद्र बनण्याची क्षमता

## डॉ. राजेश गवांदे : मौखिक आरोग्य क्षेत्रात सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्रात दंत आरोग्य सेवा, दंत पर्यटन, संशोधन व विकास तसेच दंत उपकरणांच्या उत्पादन क्षेत्रात जागतिक स्तरावरील गुंतवणुकीचे केंद्र बनण्याची क्षमता असून मौखिक आरोग्य क्षेत्रात नागरिकांना सेवा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन शासनाचे राजशिष्टाचार, परकीय थेट गुंतवणूक, प्रवासी भारतीय व्यवहार व जनसंपर्क विभागाचे सचिव तथा मुख्य राजशिष्टाचार अधिकारी डॉ. राजेश गवांदे यांनी केले.

जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर, मुंबई येथे पार पडलेल्या 'हेल्थकेअर इकोसिस्टिम अँड डेंटल टुरिझम इन महाराष्ट्र – ग्लोबल परस्पेक्टीव' या विशेष सत्रात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. यावेळी आशिया-पॅसिफिक डेंटल फेडरेशनचे अध्यक्ष डॉ. फर्नांडो फर्नांडेझ, इंडियन डेंटल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. मनोज श्रीवास्तव, इंडियन डेंटल असोसिएशनचे मानद सरचिटणीस डॉ. अशोक ढोबळे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी महाराष्ट्र शासन आणि इंडियन डेंटल असोसिएशन यांच्यात दंत पर्यटनासंदर्भातील सामंजस्य करार करण्यात आला. त्याचबरोबर इंडियन डेंटल असोसिएशन आणि सायप्रस चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री यांच्यात तसेच इंडियन डेंटल असोसिएशनतर्फे दंत शिक्षण, दंत उपचारांचे मानकीकरण, मौखिक आरोग्य निरीक्षण व डेंटल हायपरसेन्सिटिव्हिटी व्यवस्थापनासंदर्भातील विविध राष्ट्रीय उपक्रमांचेही लोकार्पण करण्यात




आले. डॉ. गवांदे यांनी आपल्या भाषणात महाराष्ट्राला परकीय गुंतवणुकीसाठी पसंतीचे केंद्र बनविणे, दंत पर्यटनाला चालना देणे आणि परदेशी दंततज्ज्ञ व कंपन्यांसाठी प्रशिक्षण, संशोधन व विकासाचे केंद्र म्हणून राज्याची ओळख निर्माण करणे या तीन प्रमुख उद्दिष्टांवर भर दिला.

ते म्हणाले, महाराष्ट्राची अर्थव्यवस्था सुमारे ६६० अब्ज डॉलर्स इतकी आहे. देशात येणाऱ्या एकूण थेट परकीय गुंतवणुकीपैकी सुमारे ४० टक्के गुंतवणूक महाराष्ट्रात येते. ही बाब उद्योगस्नेही धोरणे आणि शासनाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे शक्य झाली असल्याचे त्यांनी सांगितले.

केंद्र शासनाच्या उत्पादनाशी निगडित प्रोत्साहन (PLI) योजनेअंतर्गत वैद्यकीय उपकरणे आणि आरोग्यविषयक उत्पादनांना प्राधान्य देण्यात आले असून महाराष्ट्र शासनही वीज सवलती, कर सवलती, सवलतीच्या दरात जमीन उपलब्धता यांसारख्या विविध प्रोत्साहनपर योजना राबवत आहे. दंत उपकरणे, डेंटल इम्प्लांट्स आणि संबंधित उत्पादन क्षेत्रातील गुंतवणूकदारांना राज्य शासन सर्वतोपरी सहकार्य करेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

दंत पर्यटनाच्या संदर्भात बोलताना डॉ. गवांदे म्हणाले की, भारतात येणाऱ्या एकूण वैद्यकीय पर्यटकांपैकी २७ टक्के पर्यटक महाराष्ट्रात येतात. विकसित देशांच्या तुलनेत भारतातील दंत उपचार आणि डेंटल इम्प्लांट्सचा खर्च ७० ते ८० टक्क्यांपर्यंत कमी आहे. देशात सुमारे चार लाख दंतवैद्य उपलब्ध असून त्यांचे कौशल्य आणि अनुभव जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त आहे. कमी खर्च, कमी प्रतीक्षा कालावधी, जागतिक दर्जाची उपचार सेवा आणि तज्ज्ञ मनुष्यबळ या बाबी महाराष्ट्राला दंत पर्यटनासाठी अत्यंत आकर्षक बनवतात, असे त्यांनी नमूद केले. राज्यातील दंत उपचार सेवांचे मानकीकरण करण्यासाठी इंडियन डेंटल असोसिएशनच्या सहकार्याने विशेष केंद्रांची उभारणी करण्यात येत असून त्यामुळे महाराष्ट्राची दंत पर्यटन क्षेत्रातील ओळख अधिक बळकट होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

राज्यात जागतिक संपर्कसुविधा सक्षम आहे. तसेच राज्यातील वैद्यकीय व्यावसायिक इंग्रजी भाषेत प्रभावी संवाद साधू शकतात. त्यामुळे परदेशी रुग्ण व विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र अधिक सोयीस्कर ठरतो, असेही डॉ.गवांदे यांनी सांगितले.

मुख्यमंत्री यांच्या प्रादेशिक समतोल विकासाच्या दृष्टीकोनाचा उल्लेख करून डॉ. गवांदे यांनी राज्यातील सर्व जिल्ह्यांना विकासाच्या प्रक्रियेत समान संधी मिळाव्यात यासाठी शासनाने विविध प्रोत्साहनपर धोरणे आखल्याचे सांगितले. उद्योग क्षेत्र आणि शासन यांच्यात अधिक वारंवार संवाद होणे आवश्यक असून त्याद्वारे उद्योगासमोरील आव्हानांवर परिणामकारक उपाय शोधता येतील, असेही त्यांनी यावेळी नमूद केले.

# सुनेत्रा पवार यांच्या हस्ते बालकांना पल्स पोलिओ लसीकरण

■ बारामती येथे जिल्हास्तरीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचा शुभारंभ

■ बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब अवश्य पाजा-उपमुख्यमंत्री

■ बारामती (दै. संध्या)

'पोलिओमुक्त भारत' ही आपली सामूहिक जबाबदारी आहे; याद्दष्टीने राज्यभर राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात येत आहे; पोलिओवर मात करण्याचा प्रभावी मार्ग लसीकरण आहे, त्यामुळे

प्रत्येक पालकाने जबाबदारीने पुढे येऊन आपल्या पाच वर्षांखालील बालकांना जवळच्या लसीकरण केंद्रावर जाऊन पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब अवश्य पाजावेत, असे आवाहन राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केले.

श्रीमती पवार यांच्या हस्ते महिला शासकीय ग्रामीण रुग्णालय येथे बालकांना लसीचे दोन थेंब पाजून जिल्हास्तरीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित कार्यक्रमास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रभारी अधिष्ठाता डॉ. अंजली पाटील, जिल्हा शैल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रामचंद्र हंकारे, जिल्हा विस्तार



व माध्यम अधिकारी कल्पना पंडित, उप विभागीय अधिकारी उत्तम दिघे, महिला रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. बापू भोई, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. मनोज खोमणे आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या, पोलिओमुक्त महाराष्ट्र राज्यासह भारत देशाकरिता आपल्या पाच वर्षांखालील सर्व बालकांना जवळच्या लसीकरण केंद्रावर जाऊन पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब अवश्य पाजावेत, या लसीमुळे बालकाचे आयुष्य सुरक्षित आणि आनंददायी होण्यास मदत होणार आहे. निरोगी बालक, निरोगी कुटुंब आणि निरोगी महाराष्ट्र घडविण्यासाठी हातभार लावूया, चला एकत्र येऊया आणि पोलिओमुक्त महाराष्ट्राचा संकल्प अधिक बळकट करूया, असे आवाहन श्रीमती पवार यांनी केले.

# ९९ लाखांची सबसिडी

■ मुंबई (दै. संध्या)

केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण राज्यमंत्री भगीरथ चौधरी यांना स्वतःच्या मंत्रालयाच्या अखत्यारीतील राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाच्या योजनेतून तब्बल 99 लाख 60 हजार रुपयांचे अनुदान मिळाल्याची माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे, हे अनुदान ज्या मंडळाने मंजूर केले, त्या मंडळाच्या उपाध्यक्षपदाची जबाबदारीही चौधरी यांच्याकडेच आहे. राजस्थान मधील अजमेर जिल्ह्यातील पीह गावात भागीरथ चौधरी यांची शेती आहे. या शेतात कृत्रिम तलाव आणि चार मोठे पॉलीहाऊस उभारण्यात आले आहेत. याच ठिकाणी लावण्यात आलेल्या एका फलकामुळे हे प्रकरण उघडकीस आल्याचे सांगितले जात आहे. शेतातील फलकावर "राष्ट्रीय फलोत्पादन मंडळ, कृषी मंत्रालय, भारत सरकार यांच्या सहाय्याने प्रकल्प उभारण्यात आला" असा स्पष्ट उल्लेख करण्यात आला आहे. त्यावर लाभार्थी म्हणून भागीरथ चौधरी यांचे नाव असून, 50 टक्के अनुदान म्हणून 99 लाख 60 हजार रुपये मंजूर झाल्याची नोंद आहे. माहितीनुसार, हा प्रकल्प 16,592 चौरस मीटर क्षेत्रफळावरील काकडी शेतीसाठी उभारण्यात आला आहे. या प्रकल्पाचा एकूण खर्च 1.99 कोटी रुपये इतका असून, त्यातील 49.80 लाख रुपये स्वतः भागीरथ चौधरी यांनी गुंतवले. उर्वरित 1.49 कोटी रुपयांचे कर्ज त्यांनी एचडीएफसी बँकेकडून घेतले होते. मार्च 2026 मध्ये राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाकडून अंतिम मंजुरी मिळाल्यानंतर काही आठवड्यांतच 99 लाख 60 हजार रुपयांचे अनुदान थेट त्यांच्या एचडीएफसी बँकेच्या खात्यात जमा करण्यात आल्याचे वृत्तात नमूद करण्यात आले आहे.

# टीईटी पेपरफुटी प्रकरणाची शासनाकडून गंभीर दखल

## दोषींवर कठोर कारवाई केली जाईल – शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे रविवार, दिनांक २८ जून २०२६ रोजी राज्यभरातील १०२८ केंद्रांवर आयोजित करण्यात आलेली 'शिक्षण पात्रता परीक्षा' (TET) २०२६ पेपरफुटीची घटना घडल्याने पुढे ढकलण्यात आली आहे. या प्रकरणाची राज्य शासनाने गंभीर दखल घेतली असून दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, अशी माहिती शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी दिली आहे.

शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी सांगितले की, भिवंडी येथे काही संशयितांकडे टीईटी परीक्षेची प्रश्नपत्रिका असल्याची गोपनीय माहिती पोलीस प्रशासनाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे भिवंडी पोलिसांनी धाड टाकून संबंधित संशयितांना ताब्यात घेतले. पोलिसांनी जप्त केलेल्या प्रश्नपत्रिकेची महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या अधिकाऱ्यांकडून पडताळणी करण्यात आली. यात जप्त करण्यात आलेल्या प्रश्नपत्रिकेतील काही प्रश्न हे उद्या होणाऱ्या प्रत्यक्ष परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांशी समान असल्याचे आढळून आले आहे. या गंभीर बाबीची दखल घेऊन भिवंडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांचे हित आणि परीक्षेची पारदर्शकता जपण्यासाठी



२८ जून रोजी होणारी परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी होणे आवश्यक असल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. परीक्षेची नवीन तारीख लवकरच जाहीर केली जाईल, तसेच त्या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना नव्याने नोंदणी किंवा शुल्क भरण्याची आवश्यकता नाही, असेही मंत्री दादाजी भुसे यांनी सांगितले. मंत्री श्री.भुसे म्हणाले, या संपूर्ण प्रकरणाची मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्यासह शालेय शिक्षण विभागाने गंभीर दखल घेतली असून पोलीस प्रशासनाला सखोल चौकशीचे आदेश दिले असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### महापौर सौ. मंजुषा नागपुरे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना दप्तर व शालेय साहित्य वाटप

पुणे (दैनिक संध्या) : विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाला बळ देण्याच्या उद्देशाने , वडगाव बुद्रुक, पुणे येथे महापौर सौ. मंजुषा नागपुरे यांच्या हस्ते शालेय विद्यार्थ्यांना दप्तर व शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामागील मुख्य हेतू म्हणजे आर्थिक परिस्थितीमुळे कोणत्याही विद्यार्थ्याचे शिक्षण थांबू नये आणि प्रत्येक विद्यार्थ्याला शिक्षणासाठी आवश्यक साहित्य सहज उपलब्ध व्हावे हा होता. कार्यक्रमावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद, नवीन दप्तर घेतानाची उत्सुकता आणि पालकांच्या डोळ्यांतील समाधान हे या उपक्रमाचे खरे यश ठरले. शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना नवी दिशा देण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला. यावेळी श्री. हेमंत दादा दांगट, श्री. अविनाश चरवड, श्री. अप्पा येवले, श्री. युवराज जाधव, श्री. बापू पासलकर, श्री. संजय पवळे, श्री. शहाजी वांजळे, श्री. सचिन गायकवाड, श्री. स्वप्नील वाघ, श्री. सचिन वांजळे तसेच वडगाव परिसरातील ग्रामस्थ व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### महापौर सौ. मंजुषा नागपुरे यांच्या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

■ वटपौर्णिमेनिमित्त पुणे महानगरपालिकेकडून वडाच्या रोपांचे वाटप

पुणे (दैनिक संध्या) : वटपौर्णिमेच्या निमित्ताने महापौर सौ. मंजुषा नागपुरे यांच्या संकल्पनेतून पुणे महानगरपालिकेच्या विविध क्षेत्रीय कार्यालयांमध्ये आज सकाळपासून वडाच्या रोपांचे वाटप उत्साहात करण्यात आले. या पर्यावरणपूरक उपक्रमाला महिलांसह नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. अनेक महिलांनी वडाचे रोप स्वीकारत त्याचे संगोपन करण्याचा संकल्प केला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या अभिनव उपक्रमाचे नागरिकांनी मनापासून स्वागत करत कौतुक व्यक्त केले. यावेळी बोलताना महापौर सौ. मंजुषा नागपुरे म्हणाल्या की, "एक वडाचे रोप म्हणजे केवळ एक वृक्ष नव्हे, तर येणाऱ्या पिढ्यांसाठी सावली, शुद्ध हवा आणि हरित भविष्यासाठी दिलेली अमूल्य भेट आहे. पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येक नागरिकाने वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धनाची जबाबदारी स्वीकारणे आवश्यक आहे." शहर अधिक हरित, स्वच्छ आणि पर्यावरणपूरक करण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण होत असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

### रखडलेले शीव रस्त्याचे काम मार्गी; वाहतूक समस्येला मिळणार दिलासा



आळंदी (दैनिक संध्या) : आळंदी नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्रमांक ०८ मधील तापकीरनगर परिसरातील अत्यंत महत्त्वाच्या शीव रस्त्याचे काम अनेक दिवस विविध स्थानिक अडचणींमुळे रखडले होते. त्यामुळे परिसरातील नागरिकांना दैनंदिन वाहतूक, शालेय विद्यार्थ्यांची ये-जा तसेच वाढत्या वाहनांच्या वर्दळीमुळे मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर या रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करण्याची मागणी नागरिकांकडून होत होती. आषाढी वारी नियोजन बैठकीदरम्यान उपनगराध्यक्षा सुजाताताई तापकीर आणि गटनेते सचिन गिलबिले यांनी या रखडलेल्या कामाची गंभीर दखल घेत नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे तसेच मुख्याधिकारी माधव खांडेकर यांच्या निदर्शनास हा विषय आणून दिला. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेत संबंधित विभागाला तात्काळ काम सुरू करण्याच्या सूचना देण्यात आल्या. दरम्यान, कामातील अडथळे दूर करण्यासाठी उपनगराध्यक्षा सुजाताताई तापकीर आणि गटनेते सचिन गिलबिले यांनी पुढाकार घेत विविध संबंधित घटकांशी समन्वय साधला. तसेच रस्त्यालगतच्या जागा मालकांनीही विकासकामाचे महत्त्व ओळखून प्रशासनाला सहकार्य केल्याने अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेले हे काम अखेर मार्गी लागले.

## सासवडमध्ये पल्स पोलिओ मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद



सासवड (ता.पुरंदर) : पल्स पोलिओ मोहिमेच्या केंद्रावर उपस्थित राहून बालकांना पोलिओ डोस देण्याबाबत प्रोत्साहन देताना नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप

सासवड (दै. संध्या)

राष्ट्रीय पल्स पोलिओ अभियान २०२६ अंतर्गत सासवड परिसरात आज 'दोन थेंब पोलिओमुक्तीचे' हे अभियान मोठ्या उत्साहात राबवण्यात आले. या मोहिमेत ० ते ५ वयोगटातील ९५ टक्के बालकांना पोलिओचा डोस देण्यात यश आले असल्याची माहिती ग्रामीण रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. गजानन अक्कमर यांनी दिली. सासवड शहर व परिसरात हे अभियान यशस्वी करण्यासाठी प्रशासनाने शहरात २२ लसीकरण केंद्रांची स्थापना करण्यात आली होती, तर दुर्गम वाड्या-वस्त्या, विटभट्ट्या आणि झोपडपट्ट्यांमध्ये पोहोचण्यासाठी तीन विशेष फिरती पथके तैनात करण्यात आली होती. तसेच, प्रवाशांच्या सोयीसाठी सासवड एस.टी. स्थानक आणि पीएमपीएल स्थानकावरही पोलिओ डोस देण्याची व्यवस्था करण्यात आली होती. या मोहिमेत ६० हून अधिक परिचारिका, पाच पर्यवेक्षक, अंगणवाडी सेविका आणि स्वयंसेवकांनी मोलाचे योगदान दिले. या मोहिमेदरम्यान सासवड नगरपालिकेच्या नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप यांनी सोपाननगर येथील केंद्राला भेट देत मोहिमेचा आढावा घेतला.

ज्या बालकांना आज डोस देणे शक्य झाले नाही, त्यांना २९ जून ते ३ जुलै या कालावधीत आरोग्य पथके घरोघरी जाऊन उर्वरित बालकांना पोलिओचे डोस देणार आहेत, पालकांनी आपल्या बालकांना पोलिओ डोस देण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन आरोग्य प्रशासनाकडून करण्यात आले आहे.



# बाह्यवळण रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य

आळंदी (दै. संध्या)

**वाहनचालक त्रस्त, पालखीपूर्वी दुरुस्तीची मागणी**

संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलींचा पालखी प्रस्थान सोहळा काही दिवसांवर येऊन ठेपला असून या मार्गावरून वारकरी व भाविकांची मोठी वर्दळ अपेक्षित आहे. अशा परिस्थितीत प्रशासनाने कोणतीही दुर्घटना होण्याची वाट न पाहता तातडीने आणि दर्जेदार पद्धतीने रस्त्याची दुरुस्ती करून खड्डे बुजवावेत, अशी मागणी काँग्रेसचे माजी शहराध्यक्ष नंदकुमार वडगावकर यांनी प्रशासनाकडे केली आहे.

चर्होली खुर्द येथील मुख्य बाह्यवळण रस्त्यावर ठिकठिकाणी मोठे खड्डे पडल्याने वाहनचालकांना अक्षरशः जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. काही महिन्यांपूर्वीच पुलाच्या दुरुस्तीचे काम पूर्ण झाले असले, तरी पुलालगतच्या या महत्त्वाच्या रस्त्यावरील खड्ड्यांकडे सार्वजनिक बांधकाम विभागाने दुर्लक्ष केल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

सध्या सुरू असलेल्या पावसामुळे खड्ड्यांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचत असून, वाहनचालकांना खड्ड्यांची खोली लक्षात न आल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. रस्त्यावर चिखलाचे प्रमाणही वाढल्याने विशेषतः दुचाकीस्वारांना मोठी कसरत करावी लागत आहे. अनेक ठिकाणी वाहने घसरत असल्याच्या घटना घडत असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

याशिवाय, साचलेल्या पाण्यातून वेगाने जाणाऱ्या वाहनांमुळे पादचाऱ्यांच्या अंगावर चिखल व घाणेरडे पाणी उडत असल्याने स्थानिक नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. रोजच्या प्रवासात नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे सांगण्यात येत आहे.

खड्डेमय रस्त्यावरून वारंवार प्रवास केल्याने दुचाकीस्वारांना पाठीचे व मणक्याचे त्रास जाणवत असल्याचे वाहनचालकांचे म्हणणे आहे. तसेच खड्डे टाळण्याच्या प्रयत्नात समोरासमोर वाहने येऊन अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. चारचाकी वाहनांचे टायर व इतर सुटे भाग खराब होत असून अनेक वाहने रस्त्यातच बंद पडत असल्याने चालकांना अतिरिक्त खर्चाला सामोरे जावे लागत आहे.

## सासवडमध्ये मोफत नेत्र तपासणी शिबिराला नागरिकांचा प्रतिसाद

सासवड (दै. संध्या)



'दृष्टी स्वच्छ, जीवन समृद्ध' या ब्रीदवाक्यानुसार, रोटरी क्लब ऑफ पुणे मिडटाऊन, रोटरी क्लब ऑफ पुरंदर, विश्व निरंजन नेत्र रुग्णालय, ट्रिनिटी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग आणि के. जे. एज्युकेशनल इन्स्टिट्यूटस यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (ता.२७) सासवड येथे भव्य मोफत नेत्र तपासणी शिबिराचे व आयुष्यमान भारत या आरोग्य संरक्षण योजनेबाबत प्रबोधन व मार्गदर्शन करण्यात आले.

मार्केट यार्ड येथील दादा जाधवराव सांस्कृतिक भवनात पार पडलेल्या या शिबिरात २३५ नागरिकांनी लाभ घेतला. शिबिरात मोफत नेत्र तपासणी सह २०० जणांना औषधे, १६० जणांना चष्म्यांचे मोफत वाटप करण्यात आले. तसेच, २७ गरजू रुग्णांसाठी अल्प दरात मोतीबिंदू शस्त्रक्रियेची सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

या शिबिराचे उद्घाटन माजी मंत्री दादासाहेब जाधवराव यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी भाजपा नेते बाबा जाधवराव, आर. डी. जगताप, रोटरी क्लब ऑफ पुणे मिडटाऊनचे अध्यक्ष डॉ. चंद्रशेखर वल्हवणकर, रोटरी क्लब ऑफ पुरंदरचे अध्यक्ष प्रमोद धनावडे, माजी अध्यक्ष अनिल उरवणे, गुलाबराव गायकवाड, डॉ. प्रवीण जगताप, सचिव ॲड. आनंद जगताप, सचिन कुदळे, तुषार जगताप, प्राचार्य संदीप टिळेकर, विश्वनाथ गायकवाड, संतोष गायकवाड, आदी मान्यवर उपस्थित होते.

विश्व निरंजन नेत्र रुग्णालयाचे नेत्रतज्ज्ञ डॉ. प्रवीण जगताप, डॉ. अश्विनी जगताप, डॉ. संदीप रावत आणि डॉ. चंद्राबाबू सिद्दीकी यांनी रुग्णांची तपासणी करून त्यांना नेत्रविषयक मोलाचे मार्गदर्शन केले. नागरिकांनी या आरोग्य शिबिराचा उत्स्फूर्तपणे लाभ घेतला.

## विद्यार्थ्यांना शालेय वस्तूंचे वाटप



राजगुरुनगर (दै. संध्या)

राजगुरुनगर येथील महाराजा यशवंतराव होळकर विद्यालयातील विद्यार्थ्यांना माजी विद्यार्थ्यांच्या वतीने शालेय साहित्य व वह्या वाटप करण्यात आले. यावेळी शालेय विद्यार्थी, शिक्षक व माजी विद्यार्थी उपस्थित होते. आपण शाळेचे देने लागतो या हेतूने तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थी शिक्षणा पासून वंचित राहू नये या उद्देशाने वाफगाव येथील माजी विद्यार्थ्यांनी शालेय साहित्य व वह्या वाटप हा उपक्रम राबविला. हा स्तुत्य उपक्रम विद्यालयातील व वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी दर वर्षी राबविण्यात येत असल्याचे माजी विद्यार्थी व उपक्रमाचे संयोजक प्राध्यापक पांडुरंग थिटे यांनी सांगितले.

## पोलिओ मोहिमेच्या दिवशीच नवजीवनाचे आगमन; जन्मताच मिळाले 'सुरक्षित भविष्याचे दोन थेंब'!

नीरा (दै. संध्या)

देशभर पल्स पोलिओ मोहिमेला प्रारंभ होत असतानाच नीरा प्राथमिक आरोग्य केंद्रात घडलेल्या एका हृदयस्पर्शी घटनेने या मोहिमेला प्रेरणादायी स्वरूप प्राप्त झाले. मोहिमेच्या पहिल्याच दिवशी एका गोंडस बाळाचा जन्म झाला आणि जन्मानंतर अवघ्या काही क्षणांतच त्याला पोलिओ प्रतिबंधक लसीचा 'झिरो डोस' देण्यात आला. नवजीवनाच्या आगमनासोबतच सुरक्षित भविष्याची झालेली ही सुरुवात उपस्थितांसाठी अविस्मरणीय ठरली.



पल्स पोलिओ मोहिमेच्या दिवशीच झालेल्या या प्रसूतीमुळे प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टर, परिचारिका आणि कर्मचाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. जन्मताच बाळाला पोलिओविरोधी संरक्षण मिळाल्याने ही घटना मोहिमेच्या उद्दिष्टालाच अधोरेखित करणारी ठरली. आरोग्य विभागाच्या दृष्टीने हा दुर्मिळ आणि प्रेरणादायी योगायोग मानला जात आहे.

दरम्यान, नीरा प्राथमिक आरोग्य केंद्रातील पल्स पोलिओ मोहिमेचा शुभारंभ पुरंदर पंचायत समितीच्या सदस्या मोनिका कांबळे यांच्या हस्ते करण्यात आला. "प्रत्येक बालक पोलिओमुक्त राहिले पाहिजे" हा संदेश देत मोहिमेला उत्साहात प्रारंभ करण्यात आला. वैद्यकीय अधिकारी डॉ. नरेशकुमार बागुल यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण आरोग्य विभागाने अत्यंत तत्परतेने काम करत सुरक्षित प्रसूती पार पाडली. केतन धायगुडे, आरोग्य सहायिका मंदाकिनी खताळ, आरोग्य सहायिका बेबी तांबे, स्टाफ नर्स शुभांगी चव्हाण आणि आरोग्य सेविका योगिता टिळेकर यांनी प्रसूतीनंतर नवजात बाळाला तात्काळ पोलिओचा 'झिरो डोस' देऊन राष्ट्रीय लसीकरण मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी केली.

## विकसित भारतासाठी प्राकृतिक शेतीचा स्वीकार काळाची गरज

**रामकृष्ण वेताळ : भाजपा किसान मोर्चाच्या नीरा येथील कार्यशाळेत शेतकऱ्यांना मार्गदर्शन; दक्षिण पुण्यातील आदर्श शेतकऱ्यांचा गौरव**

नीरा (दै. संध्या)



"समृद्ध शेतकरी, सुदृढ शेती आणि निरोगी समाज" या त्रिसूत्रीच्या माध्यमातूनच विकसित भारताचे स्वप्न साकार होऊ शकते. त्यासाठी प्रत्येक शेतकऱ्याने प्राकृतिक शेतीचा स्वीकार करून या लोकचळवळीचा सक्रिय भाग बनावे, असे प्रतिपादन भारतीय जनता पक्ष किसान मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष रामकृष्ण वेताळ यांनी केले.

भारतीय जनता पार्टी किसान मोर्चा, पुणे (दक्षिण) यांच्या वतीने रविवारी (दि. २८) नीरा येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात आयोजित 'प्राकृतिक शेती कार्यशाळे'त ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी 'विकसित भारतासाठी प्राकृतिक शेती' या विषयावर राष्ट्रीय नैसर्गिक शेती फेडरेशन, पालकमंत्री कार्यालय, सांगलीचे संस्थापक अध्यक्ष विजय वरुडकर तसेच प्राकृतिक शेती तज्ज्ञ प्रवीण माने यांनी शेतकऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. रामकृष्ण वेताळ म्हणाले की, विकसित भारताच्या उभारणीसाठी शाश्वत, पर्यावरणपूरक आणि कमी खर्चिक शेती ही आजच्या काळाची गरज आहे. रासायनिक खतांचा आणि कीटकनाशकांचा वाढता वापर जमिनीचे आरोग्य बिघडवत असून उत्पादन खर्चातही मोठी वाढ होत आहे. त्यामुळे गोमाता आधारित शेती, जीवामृत, बीजामृत, आच्छादन यांसारख्या प्राकृतिक शेतीच्या तंत्रांचा अवलंब करणे आवश्यक आहे. या पद्धतीमुळे जमिनीची सुपीकता वाढते, उत्पादनाचा दर्जा सुधारतो आणि समाजाला सुरक्षित, सकस व आरोग्यदायी अन्न उपलब्ध होते, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या प्रारंभी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मन की बात' कार्यक्रमाचे सामूहिक श्रवण करण्यात आले. शेकडो शेतकरी आणि कार्यकर्त्यांनी उपस्थित राहून पंतप्रधानांचे मार्गदर्शन ऐकले.

यावेळी पुणे जिल्ह्याच्या दक्षिण भागातील भोर, वेल्हा, पुरंदर, बारामती, इंदापूर आणि दौंड तालुक्यांतील आदर्श शेतकऱ्यांचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमास माजी आमदार अशोक टेकवडे, तानाजीराव थोरात, अविनाश मोठे, सचिन लंबाते, जिल्हाध्यक्ष शेखर वडणे, प्रदेश सचिव मनोज कासवा, सरचिटणीस बाळासाहेब गरुड, पुणे जिल्हा दक्षिण किसान मोर्चाचे अध्यक्ष दिग्विजय काकडे, सरचिटणीस वैभव आटोळे, उपाध्यक्ष महादेव शेंडकर, पांडुरंग निगडे, पुरंदर मंडलाध्यक्ष संजय निगडे, योगेंद्र माने, अमोल यादव, माणिकराव चोरमले यांच्यासह भाजपा किसान मोर्चाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयोजक दिग्विजय काकडे यांनी केले. सूत्रसंचालन महादेव शेंडकर यांनी केले, तर पी. एल. निगडे यांनी आभार मानले.

